७० वर्ष

निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. ०५ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १०० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# सुनेत्राताईंना पाठिंबा दिला पाहिजे

## फडणवीसांचे आवाहन; आर. आर. आबांच्या पोटनिवडणुकीची आठवण

**मुंबई (दै. संध्या)**



बारामती विधानसभा मतदारसंघात होणाऱ्या पोटनिवडणूक संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वच पक्षांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देण्याची मागणी केली आहे. सर्वच पक्षांनी मन मोठे करून त्यांना पाठिंबा द्यावा, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. यावेळी त्यांनी माजी उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांच्या पोटनिवडणुकीची आठवण काढत, ती निवडणूक देखील बिनविरोध केली असल्याचे सांगितले.

या संदर्भात माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, सर्वच पक्षांनी सुनेत्रा ताईंना पाठिंबा दिला पाहिजे. माझी अशी सर्वांना विनंती असेल की, ही पोटनिवडणूक बिनविरोध झाली तर महाराष्ट्राला साजेशी अशा पद्धतीने परिस्थिती होईल. यापूर्वी अनेक वेळा महाराष्ट्राने बिनविरोध पोटनिवडणूक केलेली आहे. मला आठवतं की, ज्या वेळेस आर. आर. आबांचे दुःखद निधन झालं होतं. त्यावेळी आपण पोटनिवडणूक बिनविरोध केली होती. भाजपने ठरवले होते की, निवडणूक लढणार नाही. त्यामुळे सर्वच पक्षांनी मन मोठे करून बिनविरोध निवडणूक करायला हवी, असे देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. या निवडणुकीत सुनेत्रा पवार मैदानात उतरण्याची तयारी करत आहेत. त्यांनी याआधी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देऊन उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. आता आमदारकीसाठी त्या बारामतीतून निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी संपर्क साधल्याचे समोर आले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या फोन संभाषणात सुनेत्रा पवार यांनी बारामती पोटनिवडणुकीसाठी शिवसेनेचा पाठिंबा मागितला आहे. तसेच ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठीही त्यांनी चर्चा केल्याची माहिती पुढे येत आहे.

काँग्रेसने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. पक्षाने दोन्ही जागांवर उमेदवार देण्याचा निर्णय घेतला असून, यासाठी स्थानिक पातळीवरील परिस्थितीचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. बारामतीत संभाव्य उमेदवारांच्या मुलाखती नुकत्याच पार पडल्या असून, इच्छुकांची संख्या मोठी असल्याने अंतिम उमेदवार निवडताना पक्ष नेतृत्व काळजीपूर्वक निर्णय घेणार असल्याचे सांगितले जात आहे. राहुरी मतदारसंघातही उमेदवार निश्चितीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. दोन्ही ठिकाणी उमेदवारांची नावे जाहीर करण्यापूर्वी मित्रपक्षांशी चर्चा करूनच अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. महाविकास आघाडीतील जागावाटप आणि रणनीती यावरही या निर्णयाचा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत राजकीय घडामोडींना वेग येण्याचे संकेत मिळत आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. त्यांनी सांगितले की, पक्षश्रेष्ठींशी चर्चा करूनच हा निर्णय घेण्यात आला आहे. बारामतीसाठी सहा अर्ज तर राहुरीसाठी चार अर्ज प्राप्त झाले आहेत. तसेच, इच्छुक उमेदवारांच्या ऑनलाईन मुलाखतीही पार पडल्या आहेत. येत्या दोन दिवसांत निवडणुकीबाबत अधिकृत भूमिका जाहीर करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले होते.

# दमानियांना ‘सीडीआर’ पुरवतंय कोण?

### खरातच्या सीडीआरमध्ये भाजपचा एकही माणूस कसा नाही?

**मुंबई (दै. संध्या)**



नाशिकचा भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणावरून महाराष्ट्रात मोठे 'राजकीय युद्ध' सुरू झाले आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी खरातच्या मोबाईलचे कॉल डिटेल्स (CDR) बाहेर काढल्याने खळबळ उडाली असली, तरी "विरोधकांना न मिळणारी गोपनीय माहिती दमानियांपर्यंत पोहोचतेच कशी? आणि या यादीत भाजपच्या एकाही नेत्याचे नाव का नाही?" असा टोकदार सवाल शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे. शनिवारी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी सरकार आणि तपास यंत्रणांना धारेवर धरले. सुषमा अंधारे यांनी अंजली दमानिया यांच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त केला. अंजली दमानियांनी खरातचे सीडीआर रेकॉर्ड बाहेर काढले ही चांगली गोष्ट आहे. पण ही गुप्त माहिती त्यांना पुरवतंय कोण? असा सवाल अंधारे यांनी केला. दमानिया म्हणतात की तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी खरातला १७ कॉल केले होते. त्यांचा रोख एकनाथ शिंदेंच्या दिशेने आहे. मात्र, ज्यांनी खरातच्या 'इशान्येश्वर' मंदिराला पर्यटन स्थळाचा दर्जा दिला आणि १ कोटींचा निधी मंजूर केला, त्यांच्या कॉलचा रेकॉर्ड का समोर आला नाही? या यादीत भाजपच्या एकाही नेत्याचे नाव नसणे ही मोठी 'गडबड' वाटते," असेही सुषमा अंधारे म्हणाल्या. अशोक खरातच्या संपत्तीची आणि त्याच्या संपर्कातील लोकांची चौकशी करण्यासाठी स्थापन झालेल्या एसआयटीकडून (SIT) अद्याप कोणतीही ठोस माहिति समोर का आली नाही? असा सवाल सुषमा अंधारे यांनी विचारला. "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात आश्वासन दिले होते, मग अद्याप गमे, आवारे आणि पोफळे यांना ताब्यात का घेण्यात आले नाही? एसआरए खात्यातील अधिकारी भांडे तिथे काय करत होते? सरकारला हे प्रकरण तडीला न्यायचे आहे की फक्त काही लोकांना राजकीयदृष्ट्या 'डॅमेज' करायचे आहे?" असा घणाघात अंधारे यांनी केला.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

e-paper www.sandhyaepaper.com


## ढिंग-टांग




# हवाल्याद्वारे कोट्यवधींची मनी लॉन्डरिंग?

### राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा

**मुंबई (दै. संध्या)**



भोंदू अशोक खरात प्रकरणाला आता आंतरराष्ट्रीय स्तरावरचे गंभीर स्वरूप प्राप्त होत असल्याचे आरोप समोर येत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणावर भाष्य करत धक्कादायक दावे केले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, खरात हा केवळ भोंदू नसून मोठ्या आर्थिक गैरव्यवहारांच्या जाळ्याचा भाग आहे. ऑस्ट्रेलिया, दुबईसह चार-पाच देशांमध्ये हवाल्याच्या माध्यमातून पैशांची उलाढाल करण्यात आली असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. रोहित पवार यांनी सांगितले की, या व्यवहारांमध्ये केवळ वैयक्तिक फसवणूक नाही, तर भ्रष्ट अधिकारी आणि काही राजकीय नेत्यांचेही पैसे परदेशात पाठवले गेल्याची शक्यता आहे. हजारो कोटी रुपयांची रक्कम या मार्गाने बाहेर गेल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे हे प्रकरण अत्यंत गंभीर असून त्याकडे केवळ एका गुन्हेगारी घटनेप्रमाणे न पाहता व्यापक आर्थिक आणि राजकीय संदर्भात तपास करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. या पार्श्वभूमीवर त्यांनी केंद्रीय यंत्रणांकडून सखोल चौकशीची मागणी केली आहे. विशेषतः अंमलबजावणी संचालनालय (ED) सारख्या संस्थांनी या प्रकरणात लक्ष घालावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. कारण हवाल्याच्या माध्यमातून होणाऱ्या व्यवहारांचा संबंध थेट मनी लॉन्डरिंगशी जोडला जातो. त्यामुळे या प्रकरणाचा तपास केवळ राज्य स्तरावर न होता राष्ट्रीय पातळीवर होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रोहित पवार यांनी या मुद्द्याला राष्ट्रीय सुरक्षेशीही जोडले आहे. परदेशात मोठ्या प्रमाणावर पैसा पाठवला गेला असल्यास त्याचे परिणाम देशाच्या आर्थिक आणि सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर ठरू शकतात. त्यामुळे राज्य सरकारकडे यासंबंधी पुरावे उपलब्ध असतील, तर गृह विभागानेही या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा राजकीय हस्तक्षेप नको, असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

# नांदेडनंतर अकोला हादरलं; दिवसाढवळ्या चाकूने भोसकले

### धुरंदर सिनेमा पाहून येताच नशेखोरांचा धुडगूस

**अकोला (दै. संध्या)**



अकोल्यातील कौलखेड भागात अकोला पोलिसांच्या भीतीच्या दहशतीची लक्तरं वेशीवर टांगण्यात आली आहेत. शहरातील कौलखेड भागातील श्रद्धानगर 3 मध्ये नशेखोर टोळीने धुमाकूळ घातल्याचं पाहायला मिळालं. या टोळ्यक्याने तीन जणांना चाकू मारत जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली असून दोघांची प्रकृती गंभीर आहे. धुरंदर टू चित्रपट बघून आल्यानंतर नशेखोर युवकांनी परिसरात चाकू आणि पाईपच्या बळावर दहशत केल्याची ही घटना घडल्याने शहरात भीतीचे वातावरण निर्माण झालं आहे. विशेष म्हणजे, आजच धुरंधर सिनेमा पाहिल्यानंतर नांदेडमध्ये मध्यरात्री हत्याकांडाची घटना घडली होती, त्यात तिघांचा मृत्यू झाला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, श्रद्धा नगर-3 येथे अभिलाष अरविंद हिंगे (वय 32) यांच्यावर चाकू आणि लोखंडी पाईपने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांच्यावर सध्या खासगी रुग्णालयात शस्त्रक्रिया सुरू आहे. तसेच, कौलखेड चौकात रवि उर्फ छोटू ठाकरे (वय 24) याच्यावरही त्याच टोळीने हल्ला करुन जखमी केले.

घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. घटनेची माहिती मिळताच खदान पोलीस आणि एलसीबीचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. आरोपींना अटक करण्यासाठी पोलिसांकडून शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. या घटनेनंतर कौलखेड परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला. अकोल्यातील खदान पोलिसांच्या दुर्लक्षित धोरणामुळे शहरातील कौलखेड आणि इतर भागात देखील नशेखोर तरुणांची दहशत पाहायला मिळते, या दहशतीचा थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाला आहे.

### विद्यार्थ्यांना मारहाण

शाळेतील वर्गपाठाची वही न आणल्याच्या क्षुल्लक कारणावरून आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला शिक्षकाकडून लाकडी काठीने बेदम मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. धाराशिव शहरातील श्री श्री रविशंकर या खासगी शाळेतील हा प्रकार असून विद्यार्थ्याच्या वडिलांच्या तक्रारीवरून संबंधित शिक्षकाविरोधात धाराशिव शहर पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विद्यार्थ्याने क्लासवर्कची वही आणली नाही म्हणून आरोपी शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या उजव्या खांद्यावर, डाव्या हातावर, पाठीवर मारहाण केल्याची तक्रार करण्यात आली असून शिक्षकाविरोधात बाल संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल झाला आहे.

## ब्रेकिंग न्यूज

### नोकरदारांची तारांबळ

पुणे (दै. संध्या) : शहरातील अनधिकृत ओव्हरहेड केबल्सच्या विरोधातील महापालिकेने कारवाई सुरु करण्यापूर्वी केबल व्यावसायिकांशी अनेक बैठका घेतल्या होत्या. त्यांना सुधारणा करण्यासाठी काही प्रस्तावही दिले होते. मात्र त्यांच्याकडून योग्य प्रतिसाद मिळाला नाही. आता महापालिकेने अनधिकृत केबलवर कारवाई सुरु केल्याने इंटरनेट बंद पडून त्याच थेट फटका ‘वर्क फ्रॉम होम’ करणाऱ्या नोकरदारांना बसला आहे. पण महापालिकेने यापुढेही कारवाई सुरुच राहणार असल्याचे स्पष्ट केले. पुणे शहरात हजारो किलोमीटर लांबीपेक्षा जास्त लांबीच्या अनधिकृत ओव्हरहेड केबल आहेत. यातून सुमारे १० हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळू शकते. यापूर्वी चार वर्षापूर्वी यासंदर्भातील प्रस्ताव आला होता. पण तो बारगळला. आता पुन्हा एकदा महापालिकेने बेकायदेशीर ओव्हर हेड केबलवर कारवाई सुरु केली आहे. केबल व्यावसायिकांनी महापालिकेला शुल्क भरावे आणि भूमिगत केबल टाकून घ्यावी अशी भूमिका स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी घेतली आहे. भूमिगत केबल टाकण्यासाठी परवानग्या, खोदाई शुल्क, इतर अटींमुळे खर्च मोठा आहे. पण ओव्हर हेड केबल टाकताना शुल्क भरले जात नाही.

**दै. संध्या अँकर** | काळाचा भीषण घाला : सर्व मृत एकाच कुटुंबातील

# कार विहिरीत कोसळून ९ जणांचा दुर्दैवी अंत

**नाशिक (दै. संध्या)**



दिंडोरी तालुक्यातून एक अतिशय हृदयद्रावक घटना समोर आली आहे. स्नेहसंमेलनाचा आनंद साजरा करून घरी परतणाऱ्या एका कुटुंबावर काळाने भीषण घाला घातला. चालकाचा ताबा सुटल्याने कार थेट पाण्याने भरलेल्या विहिरीत कोसळली आणि या भीषण अपघातात ९ जणांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण नाशिक जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इंदोरे गावचे रहिवासी सुनील दरगुडे आणि त्यांचे कुटुंबीय एका खासगी क्लासचा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम आटोपून आनंदाने घरी परतत होते. मात्र, वाटेत अचानक कारवरील नियंत्रण सुटले आणि वाहन रस्त्याशेजारील खोल विहिरीत कोसळले. विहीर पाण्याने तुडुंब भरलेली असल्याने आतील कोणालाही बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही.

या अपघातात सुनील दरगुडे यांच्या कुटुंबातील आणि जवळच्या नातेवाईकांसह एकूण ९ जणांचा मृत्यू झाला आहे. प्राथमिक अंदाजानुसार, चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने हा अनर्थ घडला असावा. घटनेची माहिती मिळताच दिंडोरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

हा अपघात अत्यंत भीषण होता. एका हसत्या-खेळत्या कुटुंबाचा असा अंत होणे चटका लावून जाणारे आहे. पोलीस सध्या या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. स्थानिकांच्या मदतीने बचावकार्य राबवण्यात आले, मात्र दुर्दैवाने कोणाचेही प्राण वाचवता आले नाहीत. सध्या दिंडोरी पोलीस या अपघाताचा अधिक तपास करत असून, मृतांचे शवविच्छेदन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेमुळे इंदोरे गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# उद्धव ठाकरे जो उमेदवार देतील, त्याला आमचा पाठिंबा

**मुंबई (दै. संध्या)**



■ शरद पवार करणार राज्यसभा निवडणुकीतील मदतीची परतफेड; ठाकरेंना शब्द

राज्यातील आगामी विधानपरिषद निवडणुकीच्या निमिताने महाविकास आघाडीमध्ये मोठ्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे. नुकत्याच झालेल्या राज्यसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांनी शरद पवारांना खंबीर पाठिंबा दिला होता. आता या पाठिंब्याची शरद पवार 'परतफेड' करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. "विधानपरिषदेसाठी उद्धव ठाकरे जे नाव देतील, त्याला आमच्या पक्षाचा पूर्ण पाठिंबा असेल," असा शब्द शरद पवार यांनी दिला आहे. या निर्णयामुळे विधानपरिषदेची महाविकास आघाडीची एकमेव जागा आता 'ठाकरे गटा'च्या वाट्याला जाणार असल्याचे निश्चित मानले जात आहे. राज्यसभेच्या निवडणुकीनंतर आता राज्यात विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक पार पडणार आहे. विधानसभेतील संख्याबळानुसार महायुतीच्या वाट्याला ८ तर महाविकास आघाडीला केवळ १ जागा मिळण्याची शक्यता आहे. या एका जागेसाठी आघाडीत रस्सीखेच सुरू होती, मात्र शरद पवारांच्या भूमिकेमुळे हा मार्ग मोकळा झाला आहे. या एका जागेवरून आघाडीत ओढाताण सुरू असतानाच शरद पवार यांनी मोठे विधान केले आहे. पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा साधताना शरद पवार म्हणाले, माझ्या राज्यसभेच्या निवडीवेळी महाविकास आघाडीतील सर्वच पक्षांनी मोलाची मदत केली. आता विधानपरिषदेसाठी उद्धव ठाकरे जे नाव देतील, त्याला आमचे पूर्ण सहकार्य राहील.

महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना हे तीनही पक्ष एकत्रितपणे निर्णय घेतील. कोणताही निर्णय सामूहिक पद्धतीने घेतला जाईल, असेही शरद पवार यांनी स्पष्ट केले. शरद पवार यांच्या विधानामुळे ही एकमेव जागा आता 'ठाकरे गटा'च्या पदरात पडण्याची दाट शक्यता आहे. पुढील महिन्यात खुद्द उद्धव ठाकरे यांच्या विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपत असल्याने, ते स्वतः मैदानात उतरणार की एखाद्या निष्ठावान सहकाऱ्याला संधी देणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# संपादकीय

## ढळलेल्या दिवसांच्या छायेत

पालकांच्या देखभालीसंदर्भातील कायदा तेलंगणमध्ये अंमलात आला आहे. आयुष्याच्या संध्याकाळी, ढळलेल्या दिवसांच्या छायेत माणसाला जिवलगांची सोबत लागतेच. वृद्धाश्रम हा पर्याय आहे; पण तो अपरिहार्यतेतून येणारा.

तेलंगणचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी अलीकडेच दिल्लीत आले होते. त्यांच्या दिल्लीवारीचे अनेक अंतःस्थ उद्देश असणारच. पण रेड्डींनी बोलता बोलता, 'ती आपल्या नव्या विधेयकाची फाइल आहे ना', असं सहायकाला विचारलं. त्याबाबत माहिती घेतली तेव्हा कळलं की ते एक आगळंवेगळं म्हणजे आपल्या ज्येष्ठ पालकांच्या देखभालीच्या जवळपास सक्तीचीच तरतूद असलेलं विधेयक आहे. आता 'तेलंगण एम्प्लॉइज अकाउंटेबिलिटी अँड मॉनिटरिंग ऑफ पॅरेन्टल सपोर्ट बिल २०२६' हा कायदा झालाय. त्यानुसार एखादा किंवा एखादी पाल्य आपल्या आई-वडिलांची देखभाल करत नसेल, तर त्याच्या वेतनातून पंधरा टक्क्यांपर्यंत किंवा कमाल दहा हजार रुपयांपर्यंत कपात करून ती थेट पालकांना दिली जाईल. हा कायदा तेलंगणमधील सरकारी आणि खासगी अशा दोन्ही क्षेत्रांसाठी लागू असेल. विदेशात काम करणारे व लोकप्रतिनिधी यांचाही त्यात समावेश आहे. यात केवळ जैविक नव्हे; तर सावत्र पालकांचाही समावेश करून 'कुटुंबा'ची व्याख्या अधिक व्यापक केली आहे. बऱ्याचदा कायदे होतात, पण त्यांच्या अंमलबजावणीच्या नावानं शंख दिसतो. पण तेलंगणच्या या कायद्याची अंमलबजावणीही स्पष्ट प्रक्रियेद्वारे केली जाणार आहे. मुला-सुनांकडून पीडित होणारे पालक थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करू शकतात, आपली परिस्थिती मांडू शकतात आणि त्यावर साठ दिवसांच्या आत निर्णय दिला जाईल. तक्रार योग्य ठरली, तर संबंधित कर्मचाऱ्याच्या वेतनातून रक्कम कापून ती पालकांच्या खात्यात जमा केली जाईल. नोकरशाहीचे अडथळे राहणार असले तरीही एकंदर स्वरूप पाहता हा कायदा केवळ प्रतीकात्मक राहणार नाही, ही आशा आहे. हा कायदा विरोधी पक्षांच्या राज्याचा असला तरी केंद्र सरकारनंही याचा विचार करण्यास हरकत नाही. अखेर दिल्लीतलं सरकारही एका ज्येष्ठाच्याच नेतृत्वाखाली आहे ना. आज देशात ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नाची तीव्रता वाढत चालली आहे. देशभरात वाढणारी वृद्धाश्रमांची संख्या हा त्याचा एक निर्देशक. सन २०२६च्या सुरुवातीच्या एका आकडेवारीनुसार देशात किमान १,२०० ते १,५०० नोंदणीकृत वृद्धाश्रम असल्याचा अंदाज आहे आणि ही संख्या सतत वाढत आहे. सरकारी तसेच स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून चालणारे ५५१पेक्षा अधिक वृद्धाश्रम आहेत. एकट्या दिल्ली-एनसीआरमधेच ही संख्या शंभराच्या घरात पोचली आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक वृद्धाश्रम असलेल्या राज्यांपैकी एक राज्य. महाराष्ट्रात जवळपास प्रत्येक जिल्ह्यात वृद्धाश्रम आहे. अधिकृत माहितीनुसार, महाराष्ट्रात 'मातोश्री वृद्धाश्रम योजना'सारखे सुमारे ८० ते ९० फक्त सरकारी किंवा अनुदानित वृद्धाश्रम आहेत. खासगी संस्था, ट्रस्ट आणि स्वयंसेवी संघटनांनी चालवलेले वृद्धाश्रम वेगळेच. आता ही आकडेवारी खरी का खोटी, यात जाणारांचं देव भले करो! पण यातलं सामाजिक वास्तवाचं उग्र रूप संवेदनशील माणसाला अस्वस्थ करील असंच. आज अनिर्बंध शहरीकरण, वाढती लोकसंख्या, विभक्त कुटुंब पद्धती, स्थलांतर, व्यावसायिक धावपळ आणि लहानग्या वयातच बालकांच्या हाती दिला जाणारा मोबाइल नावाचा राक्षस यामुळे कुटुंबांतील संवादही कमी होत चालला आहे. ज्येष्ठांसाठी स्वतंत्र निवाऱ्याची जी गरज भासते तिच्या मागे एक खोल भावनिक वेदना दडलेली असते. भा. रा. तांबेंच्या मधुघट या कवितेत, 'ढळला रे ढळला दिन सखया, संध्या छाया भिवविती हृदया' ही ओळ येते. म्हातारपण हे दुसरं बालपण वगैरे सुविचारांच्या पलीकडे जाऊन पाहिलं तर आयुष्याच्या संध्याकाळी एकाकीपणाच्या सावल्या गडद होत जातात आणि अशा वेळी माणसाला आधाराची सर्वाधिक गरज असते. अशा वेळी वृद्धाश्रम हा अनेकांसाठी अपरिहार्य पर्याय ठरतो. दिल्ली-एनसीआरमध्ये आशीर्वाद, आंगन, सिल्व्हर लायनिंग, सुकून वगैरे वृद्धाश्रमांत सुविधा चांगल्या आहेत.

## संस्कृत सुभाषित

सदा लोकहिते युक्ता: रत्नदीपा इवोत्तमा: ॥

अर्थ : लोककल्याणात रममाण झालेले लोक रत्नाच्या दिव्याप्रमाणे कशाचीच अपेक्षा धरत नाहीत, तर ते दुसऱ्यासाठीच तेवत असतात.

## गुरु वचन

### नशिबात असेल तेच मिळेल

एका गावात सोमिलक नावाचा कष्टाळू कोष्टी होता. तो तलम कापड विणण्यात पटाईत होता. पण कष्ट भरपूर करूनसुद्धा अपेक्षित मोबदला त्याच्या हाती येत नव्हता. त्याच्या बरोबरचे इतर कोष्टी जाडंभरडं कापड विणूनसुद्धा भरपूर पैसा कमवित होते.

सोमिलकाने दुसऱ्या गावी जाऊन धंदा करण्याचे ठरविले. पण सोमिलकाची बायको त्याला म्हणाली, ''कशाला उगाच दुसऱ्या गावात जाता.... आपल्या नशिबात भरपूर पैसा मिळणार असेल तर याच ठिकाणी कापड विणून मिळेल. पण नशिबात जर नसेल तर दुसऱ्या गावी जाऊनही उपयोग काय?'' तरी हट्टाने सोमिलक दुसऱ्या गावी जातो. भरपूर कष्ट करतो आणि तिनशे मोहरा कमावतो.

त्या मोहरा घेऊन आपल्या गावी येण्यास निघतो. दमल्यामुळे एका झाडाखाली विश्रांती घेता घेता त्याला झोप लागते. थोड्यावेळाने दोन माणसांच्या संभाषणाच्या आवाजामुळे झोप उडते. त्या दोघांचे संभाषण सोमिलक ऐकतो.

''अरे, कर्त्या... सोमिलकाने आता तीनशे मोहरा कमावल्या पण त्याच्या नशिबात फक्त अन्नवस्त्रापुरताच पैसा आहे'' कर्म विचारतो. त्याबरोबर कर्ता उद्गारतो, ''त्याने कष्ट केले त्याचे फळ मी दिले. ते फळ त्याच्याकडे ठेवायचे की नाही हे तुझं काम!''

दे घोघेजण सोमिलकाचे कर्म आणि कर्ता असतात. सोमिलक पूर्ण जागा होऊन आपली मोहरांची पिशवी बघतो तर ती रिकामी असते!

## उपदेशकथा



### लोभाचा परीणाम

आकाशातील ढगांचा हेवा वाटून त्याच्या प्राप्तीसाठी एका चिमणीने उडाण भरले, ती वर वर जाऊ लागली. ढगाजवळ ती पोहचणार इतक्यात ढगाने आपली दिशा बदलली. चिमणी त्याच्याकडे जाऊ लागली. पुन्हा ती जवळ येताच ढग अंतर्धान पावला. त्याच्या शोधात चिमणी भटकू लागली. दूरवर तिला तो दिसला, त्याच्याजवळ ती गेली तर ढग पसरला त्याचे सुटे सुटे भाग झाले. कोणता भाग पकडवावा या विचारात ती चिमणी भटकू लागली. इतक्या वेळच्या उडण्याने तिचे शरीर थकले तरीही ती प्रयत्न सोडत नव्हती. ढगप्राप्तीचा तिचा लोभ सुटत नव्हता! ती त्याच्या अगदी जवळ गेली निकराचा प्रयत्न करून तिने त्याला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला तर ढगच विरून गेला आणि काहीही हाती न लागता, केवळ धावपळीनेच दमछाक झालेली ती चिमणी जमिनीवरती कोसळली.

कथा उपदेश : माणसाचेही असेच आहे. मृगजळरूपी सुखामागे धावण्यात त्याचे आयुष्य सरते. हाती काहीच लागत नाही. लोभाचा शेवट असाच.

## पंचांग

| पंचांग | सूर्य:मीन |
|---|---|
| ५ एप्रिल २०२६ | चन्द्र:वृश्चिक१७:२७:४१ |
| रविवार | हिजरी सन् – १४४५ |
| विक्रम संवत्– २०८२ | मुस्लिम मास – शव्वाल |
| चैत्रशके संवत्– १९४८ | तारीख – १६ |
| संवत्सर –पराभवनाम | विशेष |
| अयन– उत्तरायणारंभ | दुर्गादेवी रथयात्रा– |
| मास– चैत्र | आंजर्ले (रत्नागिरी) |
| ऋतु– सौर वसंत | ईस्टर संडे |
| कृष्ण पक्ष | संकष्ट चतुर्थी |
| तिथि:तृतीया १२:००:०३ | चंद्रोदय ०९.४५ |
| नक्षत्र:विशाखा | मुंबई २१.४५ |
| २४:०७:३४+ | अकोला २१.३३ |
| योग:वज्र १४:४३:१५ | अमरावती २१.३१ |
| करण:विष्टि १२:००:०३ | अहमदनगर २१.५७ |
| करण:बव २५:०३:१९+ | अलिबाग २१.४६ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | 6 | | 9 | 8 | 3 | | |
| | | 7 | | | 4 | 5 | 2 | |
| | | 5 | 7 | | | 6 | | 4 |
| 7 | 4 | 8 | | 3 | | | | 6 |
| | | | | | | | | |
| 2 | | | | 1 | | 7 | 4 | 3 |
| 8 | | 3 | | | 7 | 4 | | |
| | 5 | 2 | 6 | | | 8 | | |
| | | 4 | 3 | 8 | | 2 | 1 | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 5 | 2 | 9 | 1 | 3 | 6 | 7 | 8 |
| 9 | 6 | 1 | 2 | 7 | 8 | 5 | 3 | 4 |
| 8 | 7 | 3 | 6 | 5 | 4 | 9 | 1 | 2 |
| 7 | 1 | 9 | 4 | 2 | 5 | 3 | 8 | 6 |
| 5 | 8 | 6 | 3 | 9 | 1 | 4 | 2 | 7 |
| 3 | 2 | 4 | 8 | 6 | 7 | 1 | 5 | 9 |
| 1 | 4 | 5 | 7 | 8 | 9 | 2 | 6 | 3 |
| 6 | 3 | 7 | 1 | 4 | 2 | 8 | 9 | 5 |
| 2 | 9 | 8 | 5 | 3 | 6 | 7 | 4 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९४९ – सेंट अँथोनी रुग्णालयाला आग, ७७ ठार
- १९६० – बेन हर या चित्रपटास १० ऑस्कर पुरस्कार मिळाले.
- २००८ – जाणीवपूर्वक एचआयव्ही वायरस प्रसाराच्या आरोपावरून कॅनडातील कार्ल लियोन नामक व्यक्तीला १८ वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली.

### राष्ट्रीय

- १९१९ – बाष्पशक्तीवर चालणाऱ्या 'लॉयल्टी' या शेठ हिराचंद वालचंद यांच्या मालकीच्या बोटीतून भारतीय प्रवासी विलायतेस रवाना. त्यामुळे हा दिवस राष्ट्रीय दर्यावर्दीदिन म्हणून साजरा करण्यात येतो.
- १९४९ – भारत स्काऊट आणि गाईडची स्थापना.

### जन्म

- १८०४ – शरीर पेशींचे बनलेले असते हे सिद्ध करणाऱ्या मथायस झबयडेन या आद्यपेशी शास्त्रज्ञाचा जन्म.
- १८५६ – आफ्रिकन अमेरिकन शिक्षणतज्ज्ञ बुकर टी. वॉशिंग्टन यांचा जन्म.
- १९०८ – भारताचे माजी उपपंतप्रधान व संरक्षणमंत्री बाबू जगजीवनराम यांचा जन्म.
- १९०८ – १९३५ मध्ये 'डेंजरस' या चित्रपटासाठी ऑस्कर मिळविणाऱ्या बेट्टे डेव्हीसचा जन्म.
- १९१६ – देव आनंदचा आदर्श ग्रेगरी पेकचा जन्म. 'टू किल् अ मॅडकिंग बर्ड' या चित्रपटातील भूमिकेसाठी त्याला १९६२ चे ऑस्कर मिळाले.

### निधन

- १९२२ – पंडिता रमाबाई यांचे निधन.
- १९३२ – बंगाली कादंबरीकार प्रभातकुमार मुखोपाध्याय यांचे निधन.
- १९६४ – नकलाकार गोपाळ विनायक भोंडे यांचे निधन.

## : SMS :

Sardar opens his tiffin box in the middle of the road. Why????????
Just to confirm whether he is going to office or coming from office!!!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३३.८ | २२ |
| अहमदनगर | ३२.९ | २०.५ |
| अकोला | ३८.५ | २४.८ |
| अमरावती | ३७.८ | २४.९ |
| बीड | ४०.७ | २५.६ |
| भंडारा | ३९.८ | २५.२ |
| बुलढाणा | ३३ | २०.५ |
| चंद्रपूर | ४०.७ | २५.४ |
| चेन्नई | ३९.३ | २७.१ |
| नवी दिल्ली | ३२.५ | २३.३ |
| धुळे | ३५.४ | २३.६ |
| गोंदिया | ३८.३ | २५.४ |
| जळगाव | ३७.२ | २३.३ |
| कोल्हापूर | ३४.४ | २२.८ |
| लातूर | ३५.१ | २३ |
| मुंबई | ३३.८ | २६.७ |
| नागपूर | ३८.५ | २५.२ |
| नांदेड | ३८.१ | २५ |
| नंदूरबार | ३२.४ | २१.५ |
| नाशिक | ३२.४ | २१ |
| पुणे | ३१.४ | १९.७ |
| पंढरपूर | ३७.१ | २४.६ |
| सातारा | ३४.५ | २०.८ |
| सांगली | ३६ | २३.३ |
| सोलापूर | ३७ | २५.१ |
| वर्धा | ४०.१ | २४.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** व्यवसायाच्या दृष्टीनेही दिवस चांगला आहे. शुभ कार्यासाठी दिवस चांगला आहे. नोकरीत उत्तम स्थिती राहील.

**तुळ :** नोकरीत समाधानकारक स्थिती राहील. सार्वजनिक कामात प्रतिष्ठा लाभेल. प्रवास सुखकर होतील.

**वृषभ :** सार्वजनिक कामात प्रतिष्ठा लाभेल. आर्थिक स्थिती समाधानकारक राहील. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील.

**वृश्चिक :** मनोबल व आत्मविश्वास वाढेल. तुमच्या कार्यक्षेत्रात चांगली संधी लाभेल. विवाहेच्छुंचे विवाह जमतील. शासकीय कामात यश मिळेल.

**मिथुन :** एखादी भाग्यकारक घटना घडेल. काहींना प्रवासाचे योग येतील. नातेवाईकांचे विशेष सहकार्य लाभेल. शासकीय कामे शक्यतो पुढे ढकलावीत.

**धनु :** अनेकांचे सहकार्य लाभेल. तूळ : तुमची जोरदार आर्थिक प्रगती होणार आहे. उधारी, उसनवारी वसूल होईल. कर्मचारी वर्गाचे चांगले सहकार्य लाभेल.

**कर्क :** प्रॉपर्टीची कामेही पुढे ढकलावीत. प्रवास शक्यतो टाळावेत. फार मोठ्या यशाची अपेक्षा करू नका. उधारी, उसनवारी वसूल होईल.

**मकर :** शासकीय कामाशी संबंधित व्यक्तींना विशेष फायदा मिळेल. वैवाहिक सौख्य उत्तम लाभेल. मनोबल वाढेल.


**सिंह :** आजचा दिवस आपणाला खूप चांगला आहे. विवाहेच्छत्रुंचे विवाह जमतील. आरोग्य उत्तम राहील. शासकीय कामात यश मिळेल. मनोबल वाढेल.

**कुंभ :** मुला–मुलींच्यासंदर्भात एखादी चांगली घटना घडेल. तुमचे निर्णय योग्य ठरतील. व्यवसाय वाढेल. प्रवास शक्यतो टाळावेत.

**कन्या :** अनेकांचे सहकार्य लाभेल. व्यवसायात आर्थिक लाभ होतील. उधारी, उसनवारी वसूल होईल. आरोग्य उत्तम राहील. व्यवसायात वाढ होईल.

**मीन :** आर्थिक लाभाच्यादृष्टीने दिवस चांगला आहे. व्यवसायात वाढ होईल. नोकरीमध्ये समाधानकारक स्थिती राहील. काहींना पगारवाढीची शक्यता आहे.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०८



### आडवे शब्द

१. ब्लडप्रेशरला मराठी शब्द
४. आपला–परका असा भेद (भाव)
७. श्वापद, पशू
११. भ्रमंती
१३. डवरणे, भरून येणे
१४. फणसाचा एक प्रकार
१६. पादत्राण
१७. देशी दारू
१८. पूर्णपणे
१९. यांच्यासारखे सख्य म्हणजे पूर्ण वैरच की!
२२अ. पेशव्यांची राजधानी
२४. खंदक
२५. खुंटी, मेख
२६. सत्य
२९. आजूबाजूला
३०. सांघिक व्यायाम
३२. अनुमती
३४. घोडा
३५. स्वत:च्या नावे कालगणना सुरू करणारा राजा
३७. रोम
३९. कवी बा.भ. बोरकर यांची नादमधुर कविता– 'गडद निळे, गडद निळे --- भरूनि आले'
४१. गुडघ्याखाली येणारा हार
४४. दारूच्या आहारी गेलेला
४६. समाधान पावलेला
४७. दूध वा दूधाचे पदार्थ
४८. थडगे
५०. गुणज्ञ
५२. खवा
५३. बडबड्या
५५. माळ, हार
५७. देह
५९. मज्जाव
६०. पातळ खांब
६२. कपाळभर लावलेले कुंकू
६३. वागणूक
६४. वाईटाचे मंत्रतंत्र
६६. क्षमता, ताकद
६७. धमनी
६९. लक्ष्मी
७१. संताप
७३. बागवान
७४. बासरी
७६. गणपती
७७. किरकोळ सामान

### उभे शब्द

१. चैत्रवमीचा अवतार
२. मोठी जाड सुई
३. लट, परंतु (इंग्रजी)
४. आमिरचे बंबईय्या भाषेतील पर्यटनगीत!–'-- क्या खंडाला?
५. प्रचीती, अनुभव
६. बासुंदीपेक्षा हल्ली ही लोकप्रिय
७. स्त्रियांसाठी पूर्वी वापरले जाणारे विशेषण
८. धातूचे चलन
९. झाडाच्या चिकापासून मिळणारा चिवट पदार्थ
१०. अळूच्या भाजीत ही पालेभाजी हवीच!
१२. उबग, सुस्ती
१५. उपवासाचा कंद
१८. ही उपाधी मिरवण्यासाठी पुण्यात केवळ वास्तव्य असणे पुरेसे नाही!
१९. विकासपथावर असलेला
२०. नको त्या गोष्टीत नाक खुपसणारी
२१. कालच्या आधीचा दिवस
२२. 'स्वामी'कार रणजित देसाईंच्या पत्नी माधवी देसाई यांचे आत्मकथन– '-- गं घुमा'
२३. गाईचे पिल्लू
२५. पाप
२७. तमाशातील प्रश्नोत्तरे
२८. ही टाकणे म्हणजे पड
२९. ध्वनी, ३१. यश देणारे
३३. आश्चर्य, ३६. रवाळ
३८. सतत तक्रार करणारा
४०. करूणा, कीव
४१. अंगमेहनत करून निर्वाह करणारा
४२. घराणे
४३. हस्त
४५. तात्पुरते रुसणे
४७. पणजीचे राज्य
४८. वेदनेची तिडीक
४९. जीभ
५१. दार
५२. आत्या
५४. एक पालेभाजी
५६. श्रीमंत
५७. मंदवासर
५८. छोटा फोड
५९. चितन
६१. उंट हाकणारा
६२. मनाला आलेला थकवा
६५. भडीमार
६८. समतल
७०. तपास, शोध
७२. फक्त, केवळ
७३. चंद्राची कड
७५. घाव, प्रहार

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. १०७ चे उत्तर

आडवे उत्तर : १.दाब ३.गगनभेदी ८.वास १०.भास १२.हिमालय १४.गरजवंत १६.रानवट १८.पारंगत २०.नाग २१.रासभ २२.हयात २४.वडीलधारी २६.ताई २७.टरफल २९.पाचर ३०.पर ३२.वारस ३३.जननमरण ३५.लस ३७.माई ३८.नीरस ४०.सट ४१.महाल ४२.पडसाद ४३.ऊस ४४.वीर ४५.कप्पा ४६.नरवर ४९.महामाता ५१.होन ५३.कर ५५.चकणा ५६अ.कस ५७.पराक्रम ५९.कलेवर ६१.कलाकार ६३.जाजम ६४.तरु ६५.तापट ६७.काळवीट ६९.दादर ७२.कारभार ७३.समता ७४.कलमदान ७७.हालहवाल ७८.साल ७९.कट ८०.पाटीलकी

उभे उत्तर : २.बहिरभट ३.गलत ४.गय ५.भेग ६.दीर ७.सवंगडी ९.सरासरी १०.भाव ११.सटवाई १३.माग १५.जनावर १७.नभ १९.पाया २१.राधा २२.हलवाई २३.तपासनीस २५.लहानसहान २६.तारणहार २८.रजा ३०.परमवीरचक्र ३१.कलप ३४.नट ३६.सड ३७.मादकता ३९.सहायक ४७.रजपज ४८.वीणा ४९.मधुकर ५०.मानवता ५२.नकलाकार ५४.रट्टा ५६.कमतरता ५६ब.सकाळ ५८.रामदास ६०.रपका ६२.रवी ६६.टरफल ६८.टकमक ७०.दमदाटी ७१.मंगल ७४.कल ७५.दाट ७६.बाकी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# प्रदूषण करणाऱ्या प्रकल्पांवर कारवाई?



**महापालिकेकडे प्रमुख मागण्या**

- येरवडा येथील डांबर प्लांटमुळे होणाऱ्या प्रदूषणाची तात्काळ तपासणी करावी
- नवीन प्लांट उभारण्याचा प्रस्ताव तातडीने स्थगित करावा
- विद्यमान प्लांट घनदाट वस्तीपासून दूर हलवावा
- पर्यावरणीय नियमांची अंमलबजावणी सर्व भागांमध्ये समानपणे करावी

**पुणे (दै. संध्या)**

पुणे महानगरपालिकेकडून शहरातील रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्पांवर नुकतीच करण्यात आलेली कारवाई पर्यावरणाच्या दृष्टीने स्वागतार्ह असली, तरी ती निवडक स्वरूपाची असून प्रशासनाची दुटप्पी भूमिका उघड होत असल्याचा आरोप नगरसेवक सुहास टिंगरे यांनी केला आहे. टिंगरे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, येरवडा परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून महापालिकेचाच हॉट मिक्स डांबर (अ‍ॅस्फाल्ट) प्लांट कार्यरत असून, त्यातून होणाऱ्या प्रदूषणामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. या संदर्भात वारंवार तक्रारी, लेखी निवेदने आणि छायाचित्रांसह पुरावे सादर करूनही प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. हा मुद्दा स्थायी समितीतही मांडण्यात आला असूनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे त्यांनी नमूद केले. उलट, याच ठिकाणी अधिक क्षमतेचा नवीन हॉट मिक्स डांबर प्लांट उभारण्याची तयारी सुरू असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

“शहरातील काही भागांमध्येच कडक कारवाई केली जाते, तर इतर ठिकाणी गंभीर प्रदूषणाच्या समस्या असूनही दुर्लक्ष का केले जाते?” असा सवाल टिंगरे यांनी उपस्थित केला आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक राहणाऱ्या भागांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

टिंगरे यांनी याबाबत महापौर मंजुश्री नागपुरे यांना लेखी निवेदन दिल्याचे सांगितले असून, अद्याप कोणतीही कारवाई न झाल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

येरवडा येथील नागरिकांनाही सुरक्षित व स्वच्छ वातावरणाचा अधिकार असून, पर्यावरणाच्या बाबतीत कोणताही भेदभाव सहन केला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# संगीतमय 'फुला'चा दमदार ट्रेलर लाँच!!




- संस्कृतीच्या पदराखाली नाकारलं जाणारं तिचं अस्तित्व अशा कथासूत्रावर बेतला "फुला"
- नव्या दमाच्या कलाकारांचा "फुला"
- "फुला" १७ एप्रिलपासून चित्रपटगृहात

**पुणे (दै. संध्या)**

वाघ्या-मुरळीची पारंपरिक संस्कृती, संगीतमय गोष्ट, एका स्त्रीचा संघर्ष "फुला" या चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येणार आहे. १७ एप्रिल रोजी प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटाचा दमदार ट्रेलर लाँच करण्यात आला असून, टीजरनंतर आलेल्या ट्रेलरने चित्रपटाविषयीची उत्सुकता आता अधिकच वाढवली आहे. पैलवान अजित शिवाजी जाधव यांनी "फुला" या चित्रपटाची निर्मिती केली असून शिवशर्विल मूव्ही आणि बोधी सिनेमा यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. चित्रपटाची कथा अभिषेक जावीर यांची असून दिग्दर्शनही त्यांचेच आहे तर चित्रपटाची पटकथा रवीकिरण जावीर यांनी लिहिली आहे. समाधान ऐवळे यांनी संगीत दिग्दर्शन, अमर देवकर यांनी सर्जनशील दिग्दर्शन, रवीकिरण जावीर, समाधान ऐवळे यांनी गीतलेखन, प्रताप जोशी यांनी छायांकन, निर्मिती रचना अतुल लोखंडे यांनी केली राहुल प्रजापती यांनी संकलनाची जबाबदारी निभावली आहे. वैशाली सामंत, वैशाली माडे, रोहित राऊत, रवींद्र खोमणे, वैशाली कुलकर्णी, वैष्णवी आदोडे, आकाश नवगिरे यांनी चित्रपटातील गाण्यांना आवाज दिला आहे. प्रियांतिका, आरोही गडदे, मंजुषा खेत्री, संतोष शिंदे, देवा गाडेकर, रविकिरण जावीर, सनी कदम, छाया आदट, शरद लांडगे या नव्या दमाच्या कलाकारांचा उत्तम अभिनय आपल्याला या चित्रपटात पहायला मिळणार आहे. नृत्य दिग्दर्शन आशुतोष कीर्तिकर आणि सृष्टी जाधव यांचे आहे. वेशभूषाकार कोमल जावीर, अक्षता पाटील असून रंगभूषाकार समाधान भोरे यांनी काम पाहिले आहे.

लहान वयातच खंडोबाशी लग्न लावलेली एक मुलगी, तिच्या आयुष्यात घडणाऱ्या घडामोडी, संस्कृतीच्या पदराखाली नाकारलं जाणारं तिचं अस्तित्व अशा कथासूत्रावर "फुला" हा चित्रपट बेतला असल्याचं ट्रेलरवरून दिसून येतं. महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतील तमाशा फड, जागरण गोंधळ या पारंपरिक सांस्कृतिक पटावर आधारित ही गोष्ट आकार घेते. देखण्या दृश्यप्रतिमा, नव्या असलेले कसदार कलाकार, अस्सल संगीताचा बाज या चित्रपटातून प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे. एकीकडे एआयसारख्या तंत्रज्ञानाचा विस्तार होत असताना अजूनही परंपरांचा किती खोल पगडा समाजावर आहे याचा विरोधाभास हा चित्रपट अधोरेखित करतो. आटपाडीतील काही तरुणांनी एकत्र येऊन केलेल्या या वेगळ्या धाटणीच्या चित्रपटात सात गाणी, टीजरला लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे आता अधिकच उत्सुकता निर्माण केली आहे. आटपाडी तालुक्यातील निंबवडे सारख्या ग्रामीण भागात या चित्रपटाचे चित्रीकरण करण्यात आले आहे. संगीतमय पद्धतीनं मांडलेला संघर्ष या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### युद्धजन्य परिस्थितीत युवकांनी केला विजयाचा संकल्प : सामूहिक गदापूजन !



पुणे (दैनिक संध्या) : "आज संपूर्ण जग युद्धजन्य परिस्थितीच्या उंबरठ्यावर उभे आहे. इतिहासाचे अवलोकन केल्यास लक्षात येते की, युगानुयुगे ज्या युद्धात मारुतिराय विराजमान झाले, तिथे विजय निश्चित झाला आहे! मग ते प्रभू श्रीरामांच्या सैन्यात राहून रावणाच्या लंकेचे दहन करणारे मारुतिराय असोत, वा महाभारतात अर्जुनाच्या रथावर ध्वजस्तंभावर विराजमान होऊन अधर्माविरुद्ध पांडवांना बळ देणारे हनुमान असोत! इतकेच नव्हे, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'हिंदवी स्वराज्या'साठी समर्थ रामदास स्वामींनी गावोगावी मारुतीरायांची मंदिरे स्थापून जी बलोपासना सुरू केली, त्यातूनच स्वराज्याला आध्यात्मिक आणि सामर्थ्याचे बळ मिळाले. आज पुन्हा एकदा देश आणि धर्म संकटात असून सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. अशा काळात प्रत्येक हिंदूमध्ये मारुतीरायांसारखे शौर्य, शक्ती आणि भक्ती जागृत व्हावी अन् येणाऱ्या भीषण आपत्काळात मारुतीरायांच्या आशीर्वादाने हिंदूंचा विजय सुनिश्चित व्हावा, याच संकल्पनेतून श्री हनुमान जयंतीच्या निमित्ताने हिंदु जनजागृती समितीच्या वतीने पुणे जिल्ह्यात हडपसर, सासवड, कात्रज, चिंचवड, तळेगाव, मोशी, भोसरी, मोई आदी 62 हून अधिक ठिकाणी सामूहिक ‘गदापूजन’ करण्यात आले. गदापूजन’ विधी, श्री हनुमानाची आरती, मारुति स्तोत्रपठण, शंखनाद आणि सामूहिक प्रार्थना केल्यानंतर ‘श्री हनुमते नमः’ हा सामूहिक नामजप या गदापूजन कार्यक्रमात करण्यात आले. या वेळी ‘रामराज्याच्या स्थापनेसाठी मारुतीरायांचे गुण कसे आत्मसात करावेत’ याविषयी मार्गदर्शनही करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी ‘रामराज्याच्या स्थापनेसाठी सामूहिक प्रतिज्ञा’ घेण्यात आली. हिंदु जनजागृती समितीच्या वतीने देशभरात गेली 4 वर्ष सामूहिक ‘गदापूजन’ कार्यक्रम यशस्वीपणे घेण्यात येत आहेत आणि यावर्षीही हिंदुत्वनिष्ठ आणि भाविक यांचा उत्तम सहभाग यात दिसून आला. यावेळी मंदिर महासंघ, वारकरी संप्रदाय संघटनांचे प्रतिनिधी आदींसह विविध हिंदुत्ववादी संघटनांचे प्रतिनिधी मंदिरांचे विश्वस्त सहभागी झाले होते.

### अनधिकृत ओव्हरहेड केबलवर महापालिकेची धडक कारवाई कायम

पुणे (दैनिक संध्या) : शहरातील अनधिकृत ओव्हरहेड केबल्सच्या विरोधातील महापालिकेने कारवाई सुरु करण्यापूर्वी केबल व्यावसायिकांशी अनेक बैठका घेतल्या होत्या. त्यांना सुधारणा करण्यासाठी काही प्रस्तावही दिले होते. मात्र त्यांच्याकडून योग्य प्रतिसाद मिळाला नाही. आता महापालिकेने अनधिकृत केबलवर कारवाई सुरु केल्याने इंटरनेट बंद पडून त्याच थेट फटका ‘वर्क फ्रॉम होम’ करणाऱ्या नोकरदारांना बसला आहे. पण महापालिकेने यापुढेही कारवाई सुरुच राहणार असल्याचे स्पष्ट केले. पुणे शहरात हजारो किलोमीटर लांबीपेक्षा जास्त लांबीच्या अनधिकृत ओव्हरहेड केबल आहेत. यातून सुमारे १० हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळू शकते. यापूर्वी चार वर्षापूर्वी यासंदर्भातील प्रस्ताव आला होता. पण तो बारगळला. आता पुन्हा एकदा महापालिकेने बेकायदेशीर ओव्हर हेड केबलवर कारवाई सुरु केली आहे. केबल व्यावसायिकांनी महापालिकेला शुल्क भरावे आणि भूमिगत केबल टाकून घ्यावी अशी भूमिका स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी घेतली आहे. भूमिगत केबल टाकण्यासाठी परवानग्या, खोदाई शुल्क, इतर अटींमुळे खर्च मोठा आहे. पण ओव्हर हेड केबल टाकताना शुल्क भरले जात नाही.

# पुण्यात पालकांचं आंदोलन; मनसेच्या आंदोलकांनी केली पैशांची उधळण

**कोथरूड (दै. संध्या)**

कोथरूडमधील एमआयटी शाळेमध्ये केलेली फी वाढ अन्यायकारक आहे, ती तत्काळ रद्द करावी, अशी मागणी करत महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना व पालकांनी आंदोलन केले. पैशाची उधळण करत, शिक्षणाचे बाजारीकरण थांबवा असे आवाहन आंदोलकांनी शालेय व्यवस्थापनाला केले. "एमआयटीने नियम डावलत तीस टक्के फी वाढ केली आहे. शिक्षण हे सेवा क्षेत्र आहे. त्याचे बाजारीकरण करु नये. पालकांना विश्वासात न घेता जी फी वाढ केली आहे ती तत्काळ रद्द करावी. तुमच्या पाल्यांच्या शिक्षणावर परिणाम होईल, असे फोन करून शाळेचे व्यवस्थापन धमक्या देत आहेत. त्यांनी पालकांना अश्या प्रकारच्या धमक्या देवू नये. एमआयटीने विश्वशांतीचे सोंग बंद करावे.." अशा शब्दात मनसे विद्यार्थीसेनेच्या कार्यकर्त्यांनी आपला संताप व्यक्त केला. मनसे विद्यार्थीसेनेचे शहराध्यक्ष धनंजय दळवी, विभाग अध्यक्ष शशांक अमराळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले.

आंदोलकांनी व्यवस्थापनाशी बोलण्याचा आग्रह धरला. सोमवारी व्यवस्थापनाबरोबर प्रत्यक्ष बोलण्यासाठी वेळ देण्यात आला आहे. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्यात येईल, असे मनसे विद्यार्थी सेना व पालकांच्यावतीने सांगण्यात आले.

यासंदर्भात एमआयटी शिक्षण समुहाच्या कार्यकारी संचालक स्वाती कराड यांच्याशी दूरध्वनीवरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होवू शकला नाही. मात्र शाळा व्यवस्थापनाने सांगितले की, " प्रस्तावित शुल्कवाढ नियमानुसार करण्यात आलेली आहे आणि यासंबंधी पालक व EPTA ( शालेय शिक्षक पालक समिती) सदस्यांची बैठक घेऊन सविस्तर माहिती देण्यात आली आहे."

# डॉ. हुलगेश चलवादी यांची ‘आरपीआय’ प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती

*राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय राज्यमंत्री मा. ना. रामदास आठवलेंच्या हस्ते सत्कार*



**पुणे (दै. संध्या)**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आ) राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा.ना. रामदास आठवले साहेबांनी पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी बहुजन नेते, पुण्याचे माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांची नियुक्ती केली. संघटनात्मक कौशल्य, सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रात असलेला दांडगा अनुभव तसेच लोकसंपर्क आणि बहुजन चळवळीतील सक्रिय सहभाग लक्षात घेत मा.आठवले साहेबांनी ही जबाबदारी डॉ.चलवादी यांच्या खांद्यावर टाकली आहे.

'रेसिडेन्सी क्लब'येथे पक्षाची महाराष्ट्र प्रदेश वर्किंग कमेटीची बैठक पार पडली. या बैठकीत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.आठवले साहेबांनी राज्यातील जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीशी चर्चा करीत डॉ.चलवादी यांची प्रदेश उपाध्यक्ष पदी नियुक्तीची संघटनात्मक घोषणा केली. तीन दशकांहून अधिकचा सामाजिक-राजकीय कार्याचा अनुभव असलेले डॉ.चलवादी यांनी २४ मार्च २०२६ रोजी आरपीआय पक्षात प्रवेश करीत मा.आठवले साहेबांच्या नेतृत्वात बहुजन चळवळीत काम करण्याचा निर्धार सोडला होता.पक्षाची प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी मिळाल्यानंतर पक्ष संघटनात्मक कामासह पक्ष विस्ताराचे कार्य प्रामुख्याने हाती घेवू, अशी भावना डॉ.चलवादी यांनी व्यक्त केली. मा.ना.आठवले साहेबांनी एवढी मोठी जबाबदारी देवून आपल्यावरील त्यांचा विश्वास दाखवून दिला आहे. हा विश्वास सार्थकी ठरवून बहुजन चळवळ आणखी व्यापक करीत मा.साहेबांच्या माध्यमातून वंचित-पीडित-शोषित-उपेक्षितांना न्याय मिळवून देत विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य सातत्याने सुरु ठेऊ, असे डॉ.चलवादी म्हणाले.

बैठकीत मा.आठवले साहेबांसह महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, प्रदेश महासचिव गौतम सोनावणे, प्रदेश महिला अध्यक्ष चंद्रकला सोनकांबळे, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, पुणे महापालिकेच्या गटनेत्या हिमालीताई कांबळे, नगरसेविका निशा मानवतकर, नगरसेविका अश्विनीताई भंडारी, पिंपरी-चिंचवड चे नगरसेवक धर्मा तंतरपाले, नगरसेवक कुणाल वाव्हळकर, महाराष्ट्र रिपब्लिकन पार्टीचे सचिव बाळासाहेब जानराव, माजी नगरसेवक जयदेव रंधवे पुणे शहर व पिंपरी चिंचवड मधील आजी-माजी नगरसेवक, प्रदेश कार्यकारिणी तील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# निसर्गकवी बाबासाहेब सौदागर यांची धौस कादंबरी प्रकाशित

**श्रीरामपूर (दै. संध्या)**



श्रीरामपूर येथील सुप्रसिध्द चित्रपट गीतकार निसर्गकवी बाबासाहेब सौदागर यांची धौस कादंबरी पुणे येथील जागतिक किर्ती चे प्रकाशन दिलीपराज प्रकाशन यांनी प्रकाशित केली आहे.

महाराष्ट्रातील लोककलेची झालेली वाताहत या कादंबरीत अतिशय कलात्मक पद्धतीने चित्रीत करण्यात आलेली आहे. तमाशा ही लोककला लयाला जाऊन तिचा ऑर्केस्ट्रा झाला. जागरण गोंधळ लोककलेचा तमाशा झाला. महाराष्ट्राची शान असलेल्या लावणीचा डान्सबार झाला.अंगप्रदर्शन करीत डी जे च्या गोंगाटात अश्लील इशारे करीत पाटील आडनावे धारण करुन अनेक स्वयंघोषित लावणी सम्राज्ञी यांनी लोककलेचा बाजार मांडला. कलाकेंद्राच्या नावाखाली डान्सबार सुरू झाले.शहरातील काळे डांबरी रस्ते खेड्यात आले.ईथल्या पवित्र पायवाटा रोलरने खडी डांबराखाली गाडल्या गेल्या. तरुणपिढी वैफल्यग्रस्त झाली या सर्वांचे वास्तव चित्रण असलेली खास नगरी बोलीभाषेतील कादंबरी अतिशय कलात्मक स्वरुपात वाचकांच्या हातात आली आहे.

निसर्गकवी बाबासाहेब सौदागर यांनी अनेक मराठी चित्रपटात गीतलेखन केलेले असुन चित्ररंग या कार्यक्रमाद्वारे महाराष्ट्र भर कलाभ्रमंती केलेली आहे.त्यांच्या अनेक कविता आणि चित्रपट गीतांचा वेगवेगळ्या विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश झालेला आहे.या समृद्ध अनुभवातुन या कादंबरी चे अतिशय तरल लेखन त्यांनी केलेले आहे.या कादंबरीला जेष्ठ पत्रकार विवेक सबनिस यांची दिर्घ प्रस्तावना लाभलेली आहे. सुप्रसिद्ध चित्रकार सरदार जाधव यांचे कलात्मक चित्र लाभलेले आहे.

वेगवेगळ्या चित्रपट निर्मिती संस्था यांनी या सत्य घटनेवर आधारित कथानकावर चित्रपट निर्मिती साठी मागणी केलेली आहे. लोकसाहित्याचा अभ्यास असलेल्या नामवंत दिग्दर्शक यांना मी चित्रपट निर्मिती चे अधीकार देणार असल्याची प्रतिक्रिया कवीवर्य बाबासाहेब सौदागर यांनी आमच्या प्रतिनिधीना दिली आहे.

# बेमोसमी पावसानंतर धुळीचे लोट, रस्त्यावर खडी-मातीचा ढिगारा

**पुणे (दै. संध्या)**

पावसाचा जोर ओसरताच शहरभर धुळीचे लोट उडत असून नागरिकांचा श्वास घुसमटतोय; डोळे जळजळत आहेत, तोंडात माती जात आहे आणि खडीवरून दुचाकी घसरून अपघात होत आहेत. पाच हजार कर्मचारी आणि स्विपिंग मशिन असूनही रस्ते साफसफाईचा पत्ता नाही. महापालिकेची झाडणकाम करणारी यंत्रणा, ठेकेदार अक्षरशः बेजबाबदारपणे वागत असल्याने पुणेकर संतप्त झाले आहेत. शहरात बेमोसमी पावसामुळे दाणादाण उडाली. तासाभरात झालेल्या पावसामुळे शेकडो ठिकाणी पाणी तुंबले. हा पाण्याचा निचरा होण्यासाठी अर्ध्यातापासून ते दोन तासापर्यंतचा कालावधी लागला. त्यामुळे वाहतूक कोंडी होऊन संपूर्ण शहर ठप्प झाल्यासारखी स्थिती होती. या मुसळधार पावसामुळे अवघ्या काही मिनिटात रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आले आले होते. चौकाचौकात तळे निर्माण झाले होते. यावेळी पाण्याला प्रचंड प्रवाह असल्याने त्यासोबत कागद, प्लास्टिक, चिंध्यांच्या कचऱ्यासह माती, खडी, वाळूही वाहून आली.

# माओवादी खात्म्यावरून केंद्रावर काँग्रेसची जोरदार टीका

**‘श्रेयजीवी राजकारण थांबवा’ – गोपाळदादा तिवारी**

**पुणे (दै. संध्या)**

देशातील माओवादी/नक्षलवाद संपुष्टात आल्याच्या दाव्यावरून राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले असून, या मुद्द्यावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने केंद्र सरकारवर तीव्र टीका केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नक्षलवादाच्या खात्म्याचे श्रेय सध्याच्या मोदी सरकारला देत केलेली वक्तव्ये “बालिश, अहंकारी आणि हास्यास्पद” असल्याचा आरोप काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केला आहे.

तिवारी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले की, देशातील नक्षलवादाविरुद्धचा लढा हा केवळ अलीकडच्या काळात सुरू झालेला नसून, तो पूर्वीच्या काँग्रेस सरकारांच्या काळापासून सातत्याने सुरू आहे. अनेक काँग्रेस नेत्यांनी नक्षलवाद्यांविरुद्ध लढताना आपले प्राण गमावले असून, या संघर्षाचे संपूर्ण श्रेय एका सरकारकडे वळवणे चुकीचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

गृह मंत्रालयाच्या आकडेवारीचा दाखला देत तिवारी म्हणाले की, २००४ ते २०१३ या कालावधीत २१६० नक्षलवादी ठार करण्यात आले, तर २०१४ ते २०२५ या कालावधीत हा आकडा २०८८ इतका आहे. यावरून काँग्रेस सरकारांच्या काळात नक्षलवादाविरुद्ध अधिक प्रभावी कारवाया झाल्याचे दिसून येते. त्यामुळे नक्षलवाद कमी होण्याचे श्रेय एकट्या भाजप सरकारला देता येणार नाही, तर त्यांनी युपीए सरकारच्या धोरणांचा पुढील टप्पा म्हणूनच वापर केला, असे त्यांनी सांगितले. नक्षलवादाच्या संघर्षात अनेक वरिष्ठ काँग्रेस नेत्यांनी प्राणांची आहुती दिल्याची आठवणही त्यांनी करून दिली.




**भविष्यासाठी इशारा**

जर आदिवासींचे हक्क हिरावले गेले आणि त्यांचे शोषण सुरू राहिले, तर नक्षलवाद पुन्हा डोके वर काढू शकतो, असा गंभीर इशाराही काँग्रेसने दिला आहे. नक्षलवादाचा खरा अंत हा केवळ सुरक्षा कारवायांनी नव्हे, तर आदिवासींच्या सर्वांगीण विकास आणि सक्षमीकरणातूनच शक्य आहे, असे मत तिवारी यांनी व्यक्त केले.

आंध्र प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्रसह विविध राज्यांमध्ये माजी मंत्री, आमदार आणि नेत्यांवर झालेल्या हल्ल्यांमध्ये अनेकांचे निधन झाले. मात्र, त्या काळातील भाजप सरकारे त्यांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरली आणि काही प्रकरणांमध्ये दोषींना शिक्षा देण्यातही अपयश आले, अशी टीका त्यांनी केली. तिवारी यांच्या मते, नक्षलवाद कमी होण्यामागे केवळ लष्करी कारवाया नव्हे, तर सामाजिक आणि विकासात्मक उपाय महत्त्वाचे ठरले. युपीए सरकारने आदिवासी भागात रस्ते, शाळा, आरोग्य सेवा, मोबाईल नेटवर्क आणि वीज पुरवठा यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच नक्षलवाद्यांना मिळणारी शस्त्रसामग्री आणि पुरवठा साखळी खंडित करण्यात आली.

काँग्रेसने आपल्या कारकिर्दीत आदिवासींच्या हक्कांसाठी महत्त्वाचे कायदे केले असल्याचा दावा करत त्यांनी वनहक्क कायदा (२००६), जमीन अधिग्रहण कायदा (२०१३) आणि ग्रामसभेला अधिकार देणाऱ्या सुधारणा यांचा उल्लेख केला. या उपाययोजनांमुळे आदिवासी समाजाला न्याय मिळाला आणि नक्षलवादाकडे त्यांचा ओढा कमी झाला, असे त्यांनी स्पष्ट केले.

याउलट, भाजप सरकारने आदिवासींचे हक्क कमी करून नैसर्गिक संसाधने कॉर्पोरेट क्षेत्राच्या हाती दिल्याचा आरोपही काँग्रेसने केला. सुरजागड, नियमगिरी, हसदेव अरण्य यांसारख्या प्रकल्पांचा उल्लेख करत, आदिवासींच्या विरोधाकडे दुर्लक्ष करून मोठे प्रकल्प राबवले जात असल्याचे त्यांनी म्हटले.

२०२५ पर्यंतही देशातील अनेक जिल्हे नक्षलग्रस्त असल्याचे सरकारी आकडे सांगत असताना “नक्षलवाद संपला” हा दावा वास्तवाशी विसंगत असल्याचे तिवारी यांनी नमूद केले. नक्षलवादाविरोधी कायदे अजूनही लागू केले जात असल्याने परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आली आहे, असे म्हणणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

२०१४ ते २०२४ दरम्यान मोठ्या प्रमाणात वनजमीन बिगर वनीकरणासाठी वापरली गेल्याचा उल्लेख करत, “विकास कोणाचा, कोणासाठी आणि कोणत्या किमतीवर?” हा मूलभूत प्रश्न उपस्थित केला गेला. आदिवासींच्या संमतीशिवाय होणारा विकास हा आधुनिक वसाहतवादाचा प्रकार असल्याची कठोर टीका त्यांनी केली.

# “IPO गुंतवणुकीच्या आमिषाने १.३० कोटींची सायबर फसवणूक

## बारामती पोलिसांची झपाट्याने कारवाई, ४४ लाख रुपये फ्रीज

बारामती (दै. संध्या) :

बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. 113/2026 भा.न्या.संहिता 2023 कलम 318(4), 316(2) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम 66(C), 66(D) अन्वये नोंद असलेल्या सायबर आर्थिक फसवणुकीच्या गंभीर गुन्ह्याचा तपास बारामती शहर पोलीसांकडून अत्यंत वेगाने, तांत्रिकदृष्ट्या सक्षम पद्धतीने व प्रभावीरीत्या करण्यात येत आहे.

सदर गुन्ह्यात फिर्यादी यांची सुमारे ₹1,30,02,000/- (एक कोटी तीस लाख दोन हजार रुपये) इतकी मोठी आर्थिक फसवणूक करण्यात आलेली आहे. तपासात असे निष्पन्न झाले आहे की, फिर्यादी यांना सुरुवातीला “F24 Indian Stock Market Investors Discussion Group” नावाच्या WhatsApp ग्रुपमध्ये सामील करण्यात आले. त्या ग्रुपमधील व्यक्तींनी प्रथम फिर्यादी यांच्याशी अतिशय विश्वासार्ह पद्धतीने संपर्क साधला. त्यांनी शेअर मार्केट, IPO, ट्रेडिंग आणि जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर फिर्यादी यांना एक लिंक पाठवून FARLEYLLC नावाचे App डाउनलोड करून त्यावर खाते उघडण्यास सांगितले. संबंधित App वर बनावट स्वरूपात मोठा नफा, वाढती रक्कम, ट्रेडिंगमध्ये यश, खाते शिल्लक आणि गुंतवणुकीवर अधिक परतावा दाखवून फिर्यादी यांना सतत आणखी रक्कम भरण्यास प्रवृत्त करण्यात आले.

सदर आरोपींनी फिर्यादी यांना वारंवार असे सांगितले की, अधिक पैसे भरल्यास अधिक नफा मिळेल, IPO मध्ये मोठा परतावा मिळेल, तसेच खाते सक्रिय ठेवण्यासाठी किंवा ट्रेडिंग पुढे नेण्यासाठी अधिक निधी आवश्यक आहे. या खोट्या विश्वासार्हतेमुळे फिर्यादी यांनी विविध तारखांना विविध बँक खात्यांमध्ये मोठ्या रकमा जमा केल्या. तपासात दिसून आले आहे की, फिर्यादी यांच्याकडून घेतलेली रक्कम प्रथम काही मध्यस्थ खात्यांमध्ये जमा करण्यात आली आणि त्यानंतर layering पद्धतीने अनेक वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये वर्ग करण्यात आली. पुढे काही रक्कम ATM मधून काढण्यात आली, काही रक्कम Cash Deposit Machine च्या सहाय्याने इतर खात्यांमध्ये जमा करण्यात आली, तर काही रक्कम swipe / scanner / merchant transaction च्या माध्यमातून रोख स्वरूपात मिळविण्यात आली. या संपूर्ण पद्धतीवरून हा गुन्हा अत्यंत नियोजनपूर्वक, संघटित सायबर फसवणूक रॅकेटमार्फत घडवून आणलेला असल्याचे निष्पन्न होत आहे. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये आतापर्यंत बारामती शहर पोलीसांनी प्रभावी कारवाई करून अंदाजे ₹44,00,000/- (चव्वेचाळीस लाख रुपये) इतकी रक्कम विविध बँक खात्यांमध्ये फ्रीज करण्यात यश मिळविले आहे. गुन्ह्याचे तपासादरम्यान तपास पथकातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संदीप जाधव, पोलीस हवालदार सुलतान डांगे, पोलीस हवालदार यशवंत पवार, पोलीस हवालदार रामचंद्र शिंदे, पोलीस शिपाई सागर जामदार, पोलीस शिपाई अक्षय सिताफ, पोलीस शिपाई सुरज घाटे, पोलीस शिपाई विशाल शिंदे,




पोलीस शिपाई गिरीश नेवसे या टीमचे सहाय्याने गुन्ह्यातील दोन संशयित आरोपींना अटक करण्यात आलेली असून, त्यांच्याकडून सखोल चौकशी करण्यात येत आहे. अटक आरोपींनी गुन्ह्यातील रक्कम ATM द्वारे काढून मुख्य आरोपींच्या सांगण्यावरून State Bank of India (SBI) च्या विविध खात्यांमध्ये सुमारे ₹1,90,000/- रक्कम जमा केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर सर्व खात्यांवर देखील तात्काळ फ्रीज करण्यासाठी संबंधित बँकांना पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

अटक आरोपींच्या मदतीने मुख्य आरोपी, त्यांचे आर्थिक व्यवहार, Telegram/WhatsApp/ Instagram द्वारे कार्यरत असलेले सायबर फसवणूक जाळे आणि त्यामागील संपूर्ण रॅकेट उघड करण्यासाठी बारामती शहर पोलीसांकडून शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. सदर गुन्ह्याच्या तपासासाठी विशेष पथके तयार करण्यात आलेली असून, मनी ट्रेल, डिजिटल पुरावे, बँक व्यवहार, ATM फुटेज, मोबाईल डेटा, सोशल मीडिया लिंक, Telegram चॅट आणि सायबर नेटवर्क यांचा सखोल तपास सुरू आहे. हा तपास मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक, बारामती व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत काटेकोरपणे व परिणामकारकरित्या सुरू आहे.

बारामती शहर पोलीस नागरिकांना विशेष आवाहन करीत आहेत की, अशा प्रकारचे सायबर गुन्हे खालील पद्धतीने घडतात आणि नागरिकांनी अत्यंत सावध राहणे आवश्यक आहे. अनेक वेळा अनोळखी WhatsApp ग्रुपमध्ये add केले जाते, त्यानंतर शेअर मार्केट, IPO, ट्रेडिंग, क्रिप्टो, forex किंवा investment expert अशा नावाखाली लोकांशी संपर्क साधला जातो. सुरुवातीला कमी रकमेवर खोटा नफा दाखविला जातो. App किंवा वेबसाइटवर बनावट profit dashboard दाखवून विश्वास बसविला जातो. नंतर अधिक नफा, premium plan, urgent opportunity, pre-IPO allocation, tax clearance, withdrawal unlock, account activation, verification charge अशा वेगवेगळ्या कारणांनी वारंवार रक्कम जमा करण्यास सांगितले जाते. व्यक्तीला असे वाटते की त्याचे पैसे App मध्ये सुरक्षित आहेत, परंतु प्रत्यक्षात ती संपूर्ण प्रणाली बनावट असते आणि सर्व व्यवहार फसवणुकीचे असतात.

म्हणून नागरिकांनी कोणत्याही अनोळखी WhatsApp ग्रुप, Telegram लिंक, Instagram Reel, Facebook जाहिरात, बनावट गुंतवणूक App, अज्ञात ट्रेडिंग प्लॅटफॉर्म, IPO मध्ये हमखास जास्त परतावा, कमी वेळेत दुप्पट पैसे, tax free withdrawal, guaranteed return अशा कोणत्याही आमिषाला बळी पडू नये.

कोणतेही App डाउनलोड करण्यापूर्वी त्याची सत्यता तपासावी. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून बँक खात्यात पैसे जमा करू नयेत. केवळ मोबाईल स्क्रीनवर किंवा App वर profit दिसतो म्हणून ते खरे आहे असे समजू नये. SEBI नोंदणीकृत संस्था, अधिकृत broker, अधिकृत trading platform आणि verified financial adviser यांच्याशिवाय कोणत्याही गुंतवणुकीत पैसे टाकू नयेत. बँक खाते क्रमांक, ATM कार्ड, OTP, UPI PIN, internet banking details, KYC documents, screen sharing किंवा remote access कोणालाही देऊ नये.

> “सायबर गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असून, नागरिकांच्या पैशांचे संरक्षण आणि सायबर गुन्हे रोखणे हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे.”
>
> **- (श्रीशैल चिवडशेट्टी), प्रभारी पोलीस निरीक्षक, बारामती शहर पोलीस स्टेशन, ता. बारामती, जि. पुणे ग्रामीण**

कोणतीही सायबर फसवणूक ऑनलाइन फ्रॉड घडल्याचे लक्षात येताच त्वरित 1930 या राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधणे अत्यंत आवश्यक आहे.

फसवणूक लक्षात येताच त्याच क्षणी किंवा शक्य तितक्या कमी वेळात 1930 वर तक्रार केल्यास संबंधित बँक खात्यांवर तात्काळ फ्रीज / होल्ड / लीन मार्क लावता येऊ शकतो. यामुळे फसवणूक झालेली रक्कम पुढे इतर खात्यांमध्ये वळविण्यापासून रोखता येते आणि पीडित व्यक्तीचे पैसे पुन्हा मिळण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढते. विलंब झाल्यास पैसे विविध खात्यांमध्ये पसरविले जातात, ATM मधून काढले जातात किंवा इतर माध्यमातून पुढे वर्ग केले जातात. त्यामुळे सायबर गुन्ह्यात वेळ हे सर्वात महत्त्वाचे शस्त्र आहे.

बारामती शहर पोलीसांचे नागरिकांना स्पष्ट आवाहन आहे की, फसवणूक झाल्याचा संशय जरी आला तरी त्वरित 1930 वर कॉल करा, जवळच्या पोलीस स्टेशनला संपर्क करा, transaction screenshot, UTR number, bank statement, mobile number, link, chat, app details तात्काळ जतन करून द्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### नायगाव यात्रा गाजली, चैत्र पौर्णिमेला नायगावात भक्तांचा महासागर



पुरंदर (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील नायगाव येथील श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची चैत्र पोर्णिमेनिमित्त भव्य दिव्य आशी यात्रा संपन्न झाली.श्री क्षेत्र नायगाव येथे चैत्र पौर्णिमा तथा हनुमान जयंती निमित्त यात्रा भरते.या यात्रेचे वेगळेपण म्हणजे पुरंदरसह आसपासच्या तालुक्यांतील काही गावांतील मानाच्या काठ्यांचे शिखर स्पर्धेचे आकर्षण असते आणि यानिमित्त हजारो भाविक हा सोहळा पाहण्यासाठी उपस्थित होते. डोळ्यांचे पारणे फेडणारा हा कार्यक्रम असतो.यावेळी सागर वाळके,किरण वाळके(पेरणे,ता.हवेली) यांनी मंदिर परिसरासाठी मोफत आकर्षक विद्युत रोषणाई केली होती.सासवड,पारगाव, सिंगापूर, एखतपूर,मुंजवडी,कोथळे (ता. पुरंदर), पेरणे (ता. हवेली), एल्केभादे (ता. खंडाळा), न्हावरे (ता. शिरूर),भोंडवेवाडी (ता. बारामती) आदि काठ्यांची शिखर भेट स्पर्धा झाली. सिद्धेश्वर नायगाव म्हणून या गावाची संपूर्ण महाराष्ट्राला ओळख आहे.नवसाला पावणारा आणि भक्तांच्या हाकेला धावणारा म्हणून हजारो भाविकांची श्री सिद्धनाथावर श्रद्धा आहे.या मंदिराला शेकडो वर्षाचा इतिहास असुन छत्रपती शिवाजी महाराज यांनी देखील या मंदिराला भेट दिली असल्याचे जुने जाणकार सांगतात.नवसाला पावणारा देव म्हणून अनेक भाविक नवस बोलतात व नवस पूर्ती म्हणून अन्नदान करतात.वर्षातील सर्व पौर्णिमाच्या दिवशी नायगावला भाविकांची गर्दी असते आणि श्री काळभैरवनाथ जन्माष्टमी आणि चैत्र पौर्णिमा तथा हनुमान जयंतीला या ठिकाणी यात्रा भरते. चैत्र पौणिमेची यात्रा मोठी असून तीन दिवस चालते पहिल्या दिवशी श्री सिद्धेश्वर महाराज आणि माता जोगेश्वरी यांचा हळदीचा कार्यक्रम झाला.

### सुभाष काळे यांच्या कुशल नेतृत्वाखाली शिक्षणाला नवी दिशा – विजय कोलते

कोरेगाव मुळ (दैनिक संध्या) : अष्टापूर येथील न्यू इंग्लिश स्कूलचे आदर्श मुख्याध्यापक सुभाष बाबुराव काळे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित गौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या वेळी बोलताना पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजय कोलते यांनी, “शिक्षक सेवानिवृत्त होऊ शकतो, पण त्याच्या ज्ञानदानाच्या अखंड ज्योतीला कधीही विराम नसावा. सुभाष काळे यांच्या कुशल नेतृत्वामुळे अष्टापूर परिसरातील शैक्षणिक विकासाला नवी दिशा मिळाली,” असे गौरवोद्गार काढले. ३० मार्च रोजी विद्यालयाच्या हिरवळीने नटलेल्या परिसरात हा सोहळा पार पडला. अध्यक्षस्थानावरून बोलताना कोलते यांनी काळे सरांच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत यशस्वी ठरत असल्याचे नमूद केले. यावेळी श्रीहरी कोतवाल, नंदकुमार सागर, नितीन मेमाणे, माजी मुख्याध्यापक रामदास जगताप, सचिन कोतवाल, ऐश्वर्या मांगडे तसेच विद्यार्थिनी श्रावणी निकाळजे यांनी मनोगत व्यक्त करत काळे सरांच्या कार्याचा गौरव केला व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना सुभाष काळे यांनी संस्थेप्रती, सहकारी, पालक व विद्यार्थ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. “शिक्षणसेवा हीच माझी खरी ओळख असून ती पुढेही कायम ठेवण्याचा प्रयत्न करेन,” अशी भावना त्यांनी व्यक्त केली.



## जाहीर नोटीस

मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी पुणे यांचे समोर
(मोफा अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वय अपील) सन २०२५-२०२६

(नियोजीत) भारतीय सिटी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.
पत्ता. गट नं. १३४बी/५, प्लॉट नं. १, गाव.
जळोची, ता. बारामती, जि. पुणे ४१३१०२ - अर्जदार

**विरुद्ध**

१) श्री. सुभाष रामचंद्र जांभळकर
२) श्री. निलेश सुभाष जांभळकर
दोघे रा. सहयोग सोसायटी, भिगवन रोड, बारामती जि. पुणे ४१३१०२ - प्रतिपक्ष

वरील नमूद अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे ग्रामीण येथे मोफा अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वय अपील) अर्ज क्र.४५ /२०२५-२६ दि.२७/०२/२०२६ रोजी नोंदणी प्रस्ताव दाखल केले असता पहिली सुनावणी दि. ३०/०३/२०२६ रोजी घेण्यात आली असून पुढील सुनावणी दि. ०६/०४/२०२६ रोजी दु.०३.३० वाजता ठेवण्यात आलेली आहे. तरी संबंधित सदस्यांनी याची नोंद घ्यावी.

सही व शिक्का

सही/-
**ॲड. सुदर्शन शिवाजी बुद्रुक**
**ऑफिस - संघवी हाईटस्, महींद्रा फायनान्स जवळ, भिगवण रोड, बारामती, ता. बारामती, जि. पुणे.**
**मो. नं. ९६२३१६६०६६**




## स्मॅशर योद्धाज संघाची विजयी सलामी

**■ सारडा स्टॅलियनचेही विजय; पुणे जिल्हा माहेश्वरी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेला सुरुवात**

पुणे (दै. संध्या) :

हितेश मलच्या आक्रमक अर्धशतकाच्या जोरावर स्मॅशर योद्धाज संघाने पुणे जिल्हा माहेश्वरी प्रगती मंडळ (जिल्हा युवा समिती) यांच्या वतीने आयोजित पुणे जिल्हा माहेश्वरी प्रीमियर लीग (बेहडे पीएमपीएल) क्रिकेट स्पर्धेत मोल्डर्स संघावर सहा गडी राखून मात करून विजयी सलामी दिली. सारडा स्टॅलियन आणि साईज मास्टर स्मॅशर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात केली.

नेहरू स्टेडियमवर शनिवारपासून या स्पर्धेला सुरुवात झाली. स्पर्धेचे उद्घाटन प्रख्यात उद्योजक राजेश कासट, बेहडे ग्रुपचे निशांत बेहडे, मेटारोल ग्रुपच्या राधिका बिर्ला, संघटनेचे जिल्हा अध्यक्ष महेश सोमानी यांच्या हस्ते झाले. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी युवा अध्यक्ष रोनक झंवर, युवा सचिव मनीष मणियार, क्रीडा अध्यक्ष नीरज धूत, क्रीडा सचिव गितेश झंवर यांसह पदाधिकारी उपस्थित होते.

शनिवारी झालेल्या पहिल्या लढतीत मोल्डर्स संघाने निर्धारित १२ षटकांत ४ बाद ९७ धावा केल्या. यात कर्णधार सुमीत मुंद्राने २२ चेंडूंत चार चौकार व दोन षटकारांसह नाबाद ४३ धावा केल्या. त्याला इतरांची फारशी साथ लाभली नाही. स्मॅशर योद्धाज संघाने विजयी लक्ष्य ११.३ षटकांत चार गडींच्या मोबदल्यात साध्य केले. यात सलामीवीर हितेशने ३६ चेंडूंत आठ चौकारांसह नाबाद ५१ धावा केल्या. त्याला किरण चांडकने साथ दिली.

## शिक्षणाला बौद्धिक विकास, संवेदनशीलता, राष्ट्रप्रेम, सौहार्द व मूल्यनिष्ठेची जोड हवी

*प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन; सूर्यदत्त नॅशनल स्कुलच्या प्रारंभी ३०० विद्यार्थ्यांकडून वैश्विक शांततेसाठी मानवतावादी उपक्रम*



पुणे (दै. संध्या) :

नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला सूर्यदत्त नॅशनल स्कूलमधील ३०० विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या चौकटीपलीकडे जाऊन वैश्विक पातळीवर एक महत्त्वपूर्ण व मानवतावादी उपक्रम हाती घेतला आहे. वैश्विक स्तरावर वाढत्या संघर्षाविषयीची जाणीव, तसेच सामाजिक बांधिलकीची तीव्र भावना लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी सामूहिक निवेदन तयार करून भारताच्या पंतप्रधानांना सादर केले आहे. पंतप्रधानांनी पुढाकार घेऊन हा संघर्ष थांबविण्यात भूमिका बजवावी, तसेच वैश्विक शांतता, संवाद व समन्वय प्रस्थापित करावा, अशी विनवणी निवेदनाद्वारे केली आहे.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या समृद्ध परंपरेतून प्रेरणा घेत विद्यार्थ्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच भगवान गौतम बुद्ध यांच्या शिकवणीचा आधार घेत.‘ अहिंसा’ आणि ‘वसुधैव कुटुंबकम्’ या मूल्यांवर आधारित भारतीय संस्कृती जगासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ ठरू शकते, असा विश्वास विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. या निवेदनामध्ये युद्धाच्या मानवी परिणामांवर विशेषत्वाने प्रकाश टाकण्यात आला आहे. राजकीय व सामरिक पातळीवरील संघर्षांचे परिणाम केवळ सीमांपुरते मर्यादित न राहता त्याचा सर्वाधिक फटका निरपराध नागरिकांना, विशेषतः बालकांना सहन करावा लागत असल्याचे विद्यार्थ्यांनी नमूद केले.

वैश्विक शांततेच्या दिशेने ठोस पावले उचलण्यासाठी विद्यार्थ्यांनी सात कलमी धोरणात्मक आराखडा सादर केला आहे. त्यामध्ये संयुक्त राष्ट्रे व नाटो यांसारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठांद्वारे सुमारे २०० देशांचा सहभाग असलेले पारदर्शक व स्वेच्छिक ‘जागतिक शांतता मतदान’ राबविणे, भारताने तटस्थ व विश्वासार्ह मध्यस्थ म्हणून नेतृत्व करणे, संघर्षग्रस्त राष्ट्रांनी तात्काळ व विनाशर्त शस्त्रसंधी जाहीर करणे, आंतरराष्ट्रीय नियमांनुसार सुरक्षित व नियोजित सैन्य माघार घेणे, अण्वस्त्रांच्या वापरावर कठोर जागतिक बंदी घालणे, युद्धासाठी वापरल्या जाणाऱ्या संसाधनांचे शिक्षण, आरोग्य व पर्यावरण संवर्धनासाठी पुनर्विनियोजन करणे तसेच मानवजीवन व मूलभूत सुविधांचे संरक्षण सर्वोच्च प्राधान्याने करणे यांचा समावेश आहे.

या उपक्रमाचे कौतुक करताना सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "विद्यार्थ्यांमधील या मानवतावादी विचाराचे कौतुक केले पाहिजे.

शिक्षण केवळ बौद्धिक विकासापुरते मर्यादित नसून, ते संवेदनशीलता, संशोधन व चिकित्सक वृत्ती, मूल्यनिष्ठा व धैर्य घडविणारे असते. विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेल्या विचारांमधून वैश्विक शांततेसाठी एक सक्षम व आशादायी दिशा स्पष्टपणे दिसून येत आहे. हा उपक्रम केवळ प्रतीकात्मक नसून, वैश्विक ऐक्य, जबाबदार नेतृत्व व शांततापूर्ण सहअस्तित्व या मूल्यांप्रती विद्यार्थ्यांची असलेली बांधिलकी अधोरेखित करतो.”

“द्वेषावर प्रेमाचा विजय व्हावा, संघर्षाऐवजी संवादाचा मार्ग स्वीकारला जावा, अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे. या प्रक्रियेत भारताने नेतृत्व करावे, हीच आमची अपेक्षा आहे," अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. संजय बी. चोरडिया यांच्या कल्पनेतून, तसेच 'सूर्यदत्त'च्या उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया व सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, सूर्यदत्त नॅशनल स्कुलच्या प्राचार्या, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

# 'पिंकाथॉन'ची (Pinkathon) ऊर्जा पुन्हा परतली!

## महिलांची शक्ती आणि कणखरपणाचा गौरव करणारी, १६० किमीची 'मुंबई ते पुणे' धाव

पुणे (दै. संध्या) :

चिकाटी, कणखरपणा आणि महिला सक्षमीकरणाचा उत्साह पुन्हा एकदा सजीव झाला आहे; 'स्पिरिट ऑफ पिंकॅथॉन'च्या (Spirit of Pinkathon) सहाव्या पर्वाचा शुभारंभ झाला असून, यामध्ये मुंबई ते पुणे असा १६० किलोमीटरचा धावण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. शर्यत २ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ५:०० वाजता मुंबईतील शिवाजी पार्क येथून सुरू झाली आणि तीन दिवसांच्या कालावधीत ४ एप्रिल २०२६ रोजी पुण्यातील एएफएमसी ग्राउंड (AFMC Ground) येथे समाप्त झाली. या प्रेरणादायी प्रवासाचे नेतृत्व कॅप्टन पूजा मेहरा (निवृत्त) ४९ वर्षीय अल्ट्रा-मॅराथॉनर, मानसोपचारतज्ज्ञ, प्रेरक वक्त्या आणि भारतीय लष्करातील माजी अधिकारी आणि पूनम करंजकर, ४५ वर्षीय 'एन्ड्युरन्स रनर' (दीर्घ पल्ल्याची धावपटू) आणि माजी आयटी व्यावसायिक या दोन असाधारण धावपटू करत आहेत. 'पिंकाथॉन'च्या मूळ तत्त्वांचे,




म्हणजेच महिलांना त्यांच्या मर्यादा ओलांडण्यासाठी आणि स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य देण्यासाठी सक्षम करण्याचे, मूर्तिमंत प्रतीक बनून, या दोघी मिळून ही अत्यंत आव्हानात्मक आणि अनेक दिवस चालणारी धाव पूर्ण करतील. 'पिंकाथॉन'च्या भावनेने महिलांची शारीरिक सुदृढता आणि कल्याण याला सातत्याने अग्रक्रम दिला आहे; तसेच, समाजातील सर्व स्तरांतील महिलांना सक्रिय जीवनशैलीचा स्वीकार करण्यास आणि आपल्या स्वतःच्याच कल्पित मर्यादांना आव्हान देण्यास प्रोत्साहित केले आहे. या उपक्रमाविषयी बोलताना, पिंकथॉनचे संस्थापक मिलिंद सोमण म्हणाले, "पिंकाथॉनची ही भावना आपल्याला एक शक्तिशाली आठवण करून देते की, शारीरिक सुदृढता आणि सहनशक्ती या केवळ शारीरिक बाबी नाहीत, तर त्यांचा आपल्या मन आणि भावनांशीही सखोल संबंध असतो. दरवर्षी, देशभरातील महिला 'शक्ती'ची खरी व्याख्या काय असते, हे सातत्याने नव्याने सिद्ध करत आहेत आणि मुंबई ते पुणे दरम्यानची १६० किलोमीटरची ही धाव (run) याच भावनेचा एक ज्वलंत पुरावा आहे. पूनम आणि कॅप्टन पूजा यांनी अंगी बाणवलेली जिद्द, धैर्य आणि ध्येयनिष्ठा यांतून असंख्य इतरांना त्यांच्या स्वतःच्या फिटनेस प्रवासातील पहिले पाऊल उचलण्यासाठी प्रेरणा मिळते. महिलांनी स्वतःवर विश्वास ठेवावा आणि सक्षम बनावे, या तत्त्वासाठी पिंकथॉन नेहमीच ठामपणे उभे राहिले आहे. अशा प्रकारचे उपक्रम ती दृष्टी अत्यंत असाधारण पद्धतीने प्रत्यक्षात आणतात." इन्व्हिन्सिबल विमेनच्या संस्थापिका, अंकिता कोनवार म्हणाल्या, “पिंकाथॉनचा आत्मा हा सातत्य आणि विश्वास कालांतराने काय निर्माण करू शकतात हे दाखवण्याबद्दल आहे. अशा प्रकारच्या सहनशक्तीच्या यात्रा केवळ अंतरापुरत्या मर्यादित नाहीत, तर त्या शिस्त, लवचिकता आणि आव्हानांना न जुमानता पुढे जात राहण्याच्या धैर्याचे प्रतीक आहेत. महिलांना १६० किलोमीटर धावताना पाहून हेच सिद्ध होते की, सामर्थ्य हे वेग किंवा व्याप्तीने ठरत नाही, तर सुरुवात करण्याच्या आणि पुढे जात राहण्याच्या इच्छेने ठरते. आम्हाला आशा आहे की, अशा कथा अधिक महिलांना स्वतःच्या अधिक सक्रिय आणि आत्मविश्वासपूर्ण आवृत्तीकडे पहिले पाऊल उचलण्यासाठी प्रेरणा देतील.” कॅप्टन पूजा मेहरा (निवृत्त), ज्यांनी यापूर्वी लडाखमधील ४५२ किमीची 'शौर्य अल्ट्रा रन' आणि आर्मी डे कर्टन रेझर 'विजय रन' (मुंबई ते पुणे, डिसेंबर २०२४) यांसारखी अत्यंत खडतर सहनशक्तीची आव्हाने पूर्ण केली आहेत, त्यांनी सांगितले, “ही धाव केवळ १६० किलोमीटर अंतर कापण्यापुरती नाही, तर ती मर्यादा ओलांडण्याबद्दल आणि काय शक्य आहे याबद्दलच्या आपल्या विश्वासाला नव्याने परिभाषित करण्याबद्दल आहे. मी स्वीकारलेले प्रत्येक सहनशक्तीचे आव्हान हे एक ध्येय, शिस्त आणि इतरांना, विशेषतः महिलांना, अडथळे तोडण्यासाठी प्रेरित करण्याच्या इच्छेने प्रेरित असते. पिंकॅथॉन सक्षमीकरण आणि सामर्थ्याचे प्रतीक आहे. महिलांना त्यांच्या कम्फर्ट झोनच्या पलीकडे जाऊन निर्भयपणे आव्हाने स्वीकारण्यास प्रोत्साहित करणाऱ्या अशा चळवळीचा भाग असल्याचा मला अभिमान आहे. माझ्या प्रवासाने मला शिकवले आहे, की मर्यादा अनेकदा आपण स्वतःच निर्माण केलेल्या असतात आणि योग्य मानसिकतेने, चिकाटी कोणत्याही गोष्टीवर मात करू शकते.”

पूनम करंजकर, ज्यांनी यावर्षी धावण्याचा दहावा टप्पा गाठला आहे आणि यापूर्वी २०१९ मध्ये मुंबई ते पुणे हा मार्ग पूर्ण केला होता, त्यांच्यासाठी ही धाव वैयक्तिक आणि उद्देशपूर्ण आहे. “ही धाव माझ्यासाठी खूप खास आहे, कारण ती धावण्याच्या १० वर्षांचा वैयक्तिक टप्पा आणि माझ्या काही सर्वात मौल्यवान आठवणी देणाऱ्या प्रवासाकडे परतण्याचा क्षण आहे. 'स्पिरिट ऑफ पिंकॅथॉन' ही केवळ एक धाव नाही. ती एक भावना आहे जी महिलांना स्वतःवर विश्वास ठेवण्यास आणि पहिले पाऊल उचलण्यास प्रेरित करते, मग ते कितीही कठीण वाटले तरी. मला आशा आहे की माझा प्रवास अधिक महिलांना त्यांच्या भीतीवर मात करण्यास, फिटनेस स्वीकारण्यास आणि त्या कल्पना करू शकतात त्यापेक्षा कितीतरी अधिक करण्यास सक्षम आहेत हे जाणण्यास प्रोत्साहित करेल.” गेल्या काही वर्षांत, पिंकॅथॉन धावण्याच्या पलीकडे जाऊन एक देशव्यापी चळवळ बनली आहे, जी महिलांना त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची जबाबदारी घेण्यास प्रेरित करणारा एक मजबूत समुदाय तयार करते. 'स्पिरिट ऑफ पिंकॅथॉन'च्या धावण्याच्या स्पर्धा धैर्याच्या आणि दृढनिश्चयाच्या खऱ्या कथा समोर आणत आहेत, आणि प्रत्येक स्त्री स्वतःची नायिका बनू शकते हा संदेश अधिक दृढ करत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### एमएनजीएल गॅस पुरवठ्यात दिरंगाई केल्यास कडक कारवाई; उदय सामंत यांचा इशारा

पिंपरी (दैनिक संध्या) : हॉटेल व्यावसायिक आणि उद्योजकांना एमएनजीएल गॅस पुरवठ्यात जाणीवपूर्वक दिरंगाई होत असल्याच्या तक्रारींवर राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी कठोर भूमिका घेतली आहे. “गॅसचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून पुरवठा रोखला जात असेल, तर संबंधितांवर सरकारकडून कडक कारवाई केली जाईल,” असा इशारा त्यांनी दिला. उदय सामंत म्हणाले की, मुख्यमंत्र्यांच्या स्पष्ट सूचनांनुसार हॉटेल व्यावसायिक आणि उद्योजकांना एमएनजीएल गॅस पुरवठा सुरळीतपणे केला जाणे अपेक्षित आहे. मात्र काही ठिकाणी जाणीवपूर्वक विलंब होत असल्याच्या तक्रारी गंभीर असल्याचे सामंत यांनी नमूद केले. “कोणत्याही परिस्थितीत कृत्रिम अडथळे निर्माण करून उद्योगांना अडचणीत टाकण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही,” असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अशोक खरात सीडीआर प्रकरणावर बोलताना सामंत म्हणाले की, “ज्यांच्याशी फोनवर संवाद झाला, त्या नेत्यांनी अशोक खरातच्या कृत्याचे समर्थन केलेले नाही. संबंधित व्यक्तीने नेत्यांशी झालेल्या संभाषणाचा गैरफायदा घेत चुकीचे कृत्य केले आहे.” अशा प्रवृत्तीला आळा घालण्याची भूमिका शिवसेनेची असल्याचे त्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर एमएनजीएलकडून गॅस पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासनाकडून पुढील पावले उचलली जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

### पीएमआरडीएचा मोठा निर्णय; परवडणाऱ्या घरांसाठी ‘ॲक्शन प्लान

पिंपरी (दैनिक संध्या) : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील 674 गावांमधील ‘पंतप्रधान आवास योजने’ला (पीएमएवाय) गती देण्यासाठी पीएमआरडीएने विशेष ‘ॲक्शन प्लान’ तयार केला आहे. योजनेच्या अंमलबजावणीला वेग देण्यासाठी शहरस्तरीय तांत्रिक कक्ष अर्थात सीएलटीसीची स्थापना करण्यात येणार आहे. जेणेकरून केवळ अर्ज मागवून न थांबता, सर्व पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कार्यान्वित होईल. डॉ. अभिजित चौधरी यांनी याबाबत निर्देश दिले आहेत. या वेळी प्रकल्पातील तांत्रिक अडथळे दूर करण्यासाठी आणि अंमलबजावणीला वेग देण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. योजनेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या तांत्रिक अडचणी वेळेत सोडवण्यासाठी सीएलटीसी स्थापन करण्यात येणार आहे. या कक्षासाठी आवश्यक असलेल्या तज्ज्ञांची पदे तातडीने भरण्याच्या सूचना महानगर आयुक्तांनी दिल्या आहेत. तसेच, ‘लाभार्थी आधारित बांधकाम’ (बीएलसी) आणि ‘भागीदारीतून परवडणारी घरे’ (एएफपी) या दोन प्रमुख घटकांसाठी अनुभवी व तज्ज्ञ संस्थांची नियुक्ती केली जाणार आहे. यामुळे प्रकल्पाच्या दर्जासोबतच कामाचा वेग वाढण्यास मदत होणार आहे. परवडणाऱ्या घरांसाठी जमिनीची उपलब्धता हा मोठा अडथळा ठरतो. यावर उपाय म्हणून पीएमआरडीए हद्दीतील नऊ तालुक्यांमध्ये मोक्याच्या शासकीय जागांचा शोध घेण्याची मोहीम राबवली जाणार आहे. या जागांवर ‘एएचपी’ घटकांतर्गत गृहप्रकल्प उभारण्याच्या शक्यतेची पडताळणी केली जाईल. शक्यतो प्रत्येक विधानसभा मतदारसंघात किमान एक तरी प्रकल्प उभारण्याचे नियोजन पीएमआरडीएकडून करण्याचे सक्त निर्देश महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी दिले आहेत. यामुळे पीएमआरडीए हद्दीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी हक्काच्या घरांचा मार्ग मोकळा झाला आहे.

### कासारवाडीत कचऱ्यामुळे नागरिक हैराण; दुर्गंधी, अपघात आणि वाहतूक कोंडी

पिंपळे गुरव (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील महत्त्वाचे उपनगर आणि दळणवळणाचे केंद्र असलेल्या कासारवाडी परिसरात स्वच्छतेच्या समस्येने गंभीर स्वरूप धारण केले असून, याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर आणि दैनंदिन जीवनावर होत आहे. कचरा संकलन केंद्राजवळील परिस्थितीमुळे दुर्गंधी अस्वच्छता आणि वाहतुकीतील अडथळे वाढले आहेत. येथील कचरा वाहतूक करणारे डंपर आणि घंटागाड्या अनेकदा केंद्राच्या आवाराबाहेरच उभ्या राहत असल्याने रस्त्यावर गर्दी होते. काही वाहनांतून ओला कचरा आणि सांडपाणी (लीचेट) रस्त्यावर सांडत असल्याने रस्ते अत्यंत निसरडे झाले आहेत. परिणामी दुचाकीस्वारांचे घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढल्याची नागरिकांची तक्रार आहे. कासारवाडी रेल्वे स्थानक परिसरातून दररोज हजारो प्रवासी ये-जा करतात. मात्र, परिसरात पसरलेल्या दुर्गंधीमुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत असून, अनेकांना नाकाला रुमाल लावूनच प्रवास करावा लागत आहे. याशिवाय साचलेल्या कचरा आणि सांडपाण्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढून साथीचे आजार पसरण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. वाहतुकीच्यादृष्टीनेही परिस्थिती चिंताजनक बनली आहे. कचरा केंद्राच्या आत जागा उपलब्ध असतानाही काही वाहनचालक डंपर रस्त्यावरच उभे करतात.




# संघटनेचे काम न करणाऱ्यांना पदावरून दूर करणार

**संपर्कप्रमुख, उद्योगमंत्री उदय सामंत यांचा इशारा**

**पिंपरी (दै. संध्या)**

शिवसेना संघटनेतील जे पदाधिकारी पदे घेऊन काम करीत नाहीत. त्यांना पदावर ठेवायचे की नाही याबाबत निर्णय घेण्यात येईल. कार्यकारिणी बरखास्त होऊन आताचे पदाधिकारी आजपासून प्रभारी म्हणून काम करतील. पुढील ३० दिवस मतदारसंघातील संघटनेच्या कामाची माहिती घेतली जाईल. चांगले काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना पदांवर कायम ठेवले जाईल. चांगले काम न करणाऱ्यांना पदावरून दूर करण्यात येणार असल्याचा इशारा शिवसेनेचे पुणे जिल्हा संपर्कप्रमुख, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिला. पुणे, मावळचे संपर्कप्रमुख झाल्यानंतर सामंत यांनी शुक्रवारी आढावा बैठक घेतली. पिंपरी, चिंचवड, भोसरी, मावळ विधानसभा मतदारसंघातील सर्व शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, युवती सेनेच्या कामाचा आढावा घेतला. थेरगाव येथील मोरया बँकेट हॉलमध्ये बैठक पार पडली. शिवसेना उपनेते खासदार श्रीरंग बारणे, उपनेते इरफान सय्यद, उपनेत्या सुलभा उबाळे, शहरप्रमुख नगरसेवक नीलेश तरस, जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर, समन्वयक बाळासाहेब वाल्हेकर, उपजिल्हाप्रमुख दिलीप पांढारकर, शरद हुलावळे, नगरसेवक निलेश बारणे, राजेंद्र तरस युवासेना मावळ लोकसभा प्रमुख, मावळ तालुका प्रमुख रामभाऊ सावंत, विशाल हुलावळे, युवा सेना जिल्हा प्रमुख सागर पाचारणे, युवती सेना जिल्हाप्रमुख सायली साळवी, शहरप्रमुख श्वेता कापसे यावेळी उपस्थित होते.

उदय सामंत म्हणाले, पक्ष संघटनेच्या कामाबाबत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे झोकून देऊन काम करतात. त्यांच्याप्रमाणे शिवसैनिकांनी काम करावे. त्यांचा आदर्श ठेवून काम केल्यास शहरात भगवेमय वातावरण होईल. मतदार याद्या तपासणीचे काम सुरू आहे. त्यावर बारकाईने लक्ष ठेवावे. जे पदाधिकारी पदे घेऊन काम करीत नाहीत. त्यांना पदावर ठेवायचे की नाही याबाबत निर्णय घेण्यात येईल. कार्यकारिणी बरखास्त होऊन आताचे पदाधिकारी आजपासून प्रभारी म्हणून काम करतील. पुढील ३० दिवस मतदारसंघातील संघटनेच्या कामाची माहिती घेतली जाईल. चांगले काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना पदांवर कायम ठेवले जाईल. चांगले काम न करणाऱ्यांना पदावरून दूर करून नवे पदाधिकारी नियुक्त केले जातील. संघटना महत्वाची आहे. संघटनेपेक्षा कोणी मोठे नाही.

> खासदार बारणे म्हणाले, महापालिका निवडणुकीत कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम संघटनेने केले. शिवसैनिकांनी केवळ पदाची अपेक्षा न ठेवता झोकून देऊन संघटना वाढीसाठी काम करावे. मला कोणते पद मिळाले नाही तर मी जातो अशी कोणी भूमिका घेऊ नये. शिवसेनेच्या विचाराशी एकरूप होऊन काम करावे. इतर पक्षापेक्षा शिवसेनेची कामाची पद्धत वेगळी आहे. शिवसेनेत विचारावर श्रद्धा ठेवून काम केले जाते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली संघटना वाढवायची आहे. पुढील तीन वर्षे कोणतीही निवडणूक नाही. त्यामुळे संघटना बळकट करण्याची मोठी संधी आहे. याचा फायदा घेऊन संघटना मजबुत होण्यासाठी सर्वांनी काम करावे.

## नवलेख उंबरेत थंड पेय व्यवसाय कोलमडला

**पिंपरी (दै. संध्या)**



उन्हाळ्याच्या दिवसात जोमात सुरू असलेला शीतपेय व्यवसाय अवकाळी पावसामुळे अक्षरशः कोलमडला आहे. अचानक बदललेल्या हवामानामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून, थंड पेयांची मागणी झपाट्याने घटली आहे. याचवेळी युद्धजन्य परिस्थितीमुळे वाढलेली महागाई आणि इंधन दरांचा परिणाम यामुळे खर्च वाढल्याने विक्रेत्यांचे दुहेरी नुकसान होत आहे. परिणामी, लहान व्यावसायिकांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. एप्रिल महिन्यात साधारणतः ज्यूस, शरबत, आईस्क्रीम यांना मोठी मागणी असते. या काळात अनेक छोटे व्यावसायिक तात्पुरते स्टॉल लावून किंवा गाड्या उभ्या करून चांगला व्यवसाय करतात. मात्र, यंदा अवकाळी पावसाने या सर्व गणितावर पाणी फेरले आहे. सलग पावसामुळे नागरिक घराबाहेर पडणे टाळत असून, बाहेर पडले तरी गरम पेय किंवा खाद्यपदार्थांकडे त्यांचा कल वाढला आहे. अनेक विक्रेत्यांनी कर्ज काढून किंवा उधारीवर माल आणून व्यवसाय सुरू केला आहे. मात्र, विक्री घटल्याने त्यांची आर्थिक घडी विस्कटत चालली आहे.

## पिंपळे सौदागरला मिळणार स्वतंत्र पोलीस ठाणे

**पिंपरी (दै. संध्या)**

- आमदार शंकर जगताप व शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश
- स्वतंत्र पोलीस ठाण्यामुळे सुरक्षा कवच होणार भक्कम



गेल्या काही वर्षांत आयटी हब आणि वेगाने विकसित होणारे नागरी क्षेत्र अशी ओळख निर्माण झालेल्या पिंपळे सौदागर परिसराच्या सुरक्षिततेसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. पिंपळे सौदागरसाठी आता स्वतंत्र पोलीस ठाणे मंजूर होण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून, पोलीस आयुक्तालयाने तसा अधिकृत प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला आहे. आमदार शंकर जगताप आणि भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या अथक पाठपुराव्यामुळे पिंपळे सौदागरकरांची ही अनेक वर्षांची मागणी आता पूर्णत्वास येत आहे.

पिंपळे सौदागरसाठी स्वतंत्र पोलीस ठाणे का आवश्यक?

पिंपळे सौदागर हे शहर केवळ पिंपरी-चिंचवडच नव्हे, तर राज्यातील एक महत्त्वाचे निवासी आणि व्यावसायिक केंद्र बनले आहे. या भागातील मोठ्या गृहनिर्माण सोसायट्या, शाळा आणि वाढती लोकसंख्या पाहता, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी येथे स्वतंत्र पोलीस ठाण्याची नितांत गरज होती. सध्या या भागाला जवळच्या पोलीस ठाण्यांवर अवलंबून राहावे लागत असल्याने पोलिसांना घटनास्थळी पोहोचण्यास विलंब होत असे. ही अडचण लक्षात घेऊन लोकप्रतिनिधींनी यासाठी विशेष प्रयत्न केले. शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी स्थानिक नागरिकांच्या भावना आणि सुरक्षेचा प्रश्न वारंवार प्रशासकीय बैठकीत मांडला होता. आमदार शंकर जगताप यांनी या विषयाचे गांभीर्य ओळखून थेट गृह मंत्रालयाकडे हा विषय लावून धरला होता. या दोघांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे पोलीस आयुक्तालयाने केवळ नवीन पोलीस ठाण्यांचाच नाही, तर प्रशासकीय सुलभतेसाठी नवीन ‘परिमंडळ ४’ चा प्रस्तावही दिला आहे. पिंपळे सौदागरमध्ये स्वतःचे पोलीस ठाणे असल्याने पोलिसांची गस्त वाढेल आणि कोणत्याही तक्रारीवर त्वरित कारवाई होईल.

चेन स्नॅचिंग, घरफोडी आणि वाहतूक कोंडी यांसारख्या स्थानिक समस्यांवर कडक नियंत्रण मिळवणे सोपे होईल. नागरिकांना सोय: पोलीस तक्रारीसाठी किंवा इतर कामांसाठी नागरिकांना लांबच्या पोलीस ठाण्यात जाण्याची गरज भासणार नाही.

## भामा आसखेड पाणी योजनेला जानेवारीचा “अल्टिमेटम”

- भाजपा आमदार महेश लांडगे यांची महत्त्वपूर्ण बैठक; महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे आश्वासन

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी याचा विचार करुन भामा आसखेड पाणी योजना पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी जानेवारी-२०२७ चा ‘अल्टिमेटम’ महापालिका प्रशासनाला दिलेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते निर्धारित वेळेत प्रकल्पाचे लोकार्पण होईल, अशी माहिती भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली. पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार महेश लांडगे यांनी आंद्रा, भामा आसखेड पाणी पुरवठा योजनेसंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक घेतली. सत्तारुढ पक्षनेता प्रशांत शितोळे, मुख्य अभियंता प्रमोद ओंबासे, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता दीपक पाटील आदी अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत शहरातील पाण्याच्या उपलब्धतेबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आणि आगामी कामांची तातडीने गती मिळविण्यासाठी उपाययोजना निश्चित केल्या आहेत. या योजेतील भामा आसखेड जलउपसा केंद्रावर काम प्रगतीवर आहे. जॅकवेल – १००% पूर्ण झाले आहे. पंप हाऊस – ७५%, सबस्टेशन – ८०%, अप्रोच



ब्रिज –५% आणि विद्युत, यांत्रिकी, Instrumentation, SCADA साहित्य – १००% उपलब्ध झाले आहेत. शहराला पाणी उपसा करणाऱ्या दोन्ही बंधाऱ्यातील पाणी प्रदूषणाची समस्या गंभीर बनली आहे. याबाबत आपण विधानसभा सभागृहातही मंत्रीमहोदय यांचे लक्ष वेधले आहे. पुरवठा होणारे पाणी प्रदूषित असल्यामुळे त्यावर प्रक्रिया करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची पाणी प्रक्रिया यंत्रणा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. सेकंडरी ट्रिटमेंटनंतर आता टर्शरी ट्रिटमेंट करावी लागणार आहे. त्याठिकाणी ड्रेनेजचा वास येतो. त्यासाठी तातडीने निर्णय घ्यावा. तसेच, निगडी ऑग्युमेंन्टेशन टप्पा दोनचे काम सुरू करण्याची आवश्यकता आहे. निगडी WTP – ४२८ MLD (१०० MLD वाढ, एकूण ५२८ MLD) कामाला गती द्यावी, अशी सूचना आमदार लांडगे यांनी केली. भामा आसखेड धरण येथील अशुद्ध जलउपसा केंद्र पासून नवलाख उंबरे येथील बी.पी.टी पर्यंत १७०० मि.मी जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. या कामाचा ठेकेदार – मे. ऑफशोर इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी दिलेल्या मुदतीमध्ये काम केलेले नाही. तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डिकर यांनी सदर ठेकेदाराचे काम रद्द केले आहे. नवीन निविदा काढणे किंवा न काढणे हा प्रशासनाचा अधिकार आहे. पण, या प्रकल्पाचे काम निश्चित वेळेत झाले पाहिजे. त्यासाठी संबंधित ठेकेदार याला जाचक अटी आणि दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे नमूद करा.

> “पिंपरी-चिंचवडच्या पाणी पुरवठा प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागातील अनुभवी अधिकारी आणि महापालिका अस्थापनेवर असणारा अधिकारी भूसंपादन व विविध परवानग्यांसाठी पूर्णवेळ नियुक्त केला पाहिजे. तशी सूचना प्रशासनाला केली आहे. आंद्रा-भामा आसखेड पाणी योजना पिंपरी-चिंचवडसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. जानेवारी- २०२७ मध्ये कोणत्याही परिस्थितीत पूर्ण क्षमतेने योजना सुरू होईल. या करिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करीत आहोत.
> **– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# “जलस्वयंपूर्ण पिंपरी-चिंचवड” संकल्पनेसाठी भाजपा आग्रही..!

**महापौर, शहराध्यक्ष, आमदारांचा ‘मॅरेथॉन’ पाठपुरावा; पाणी पुरवठा योजना मार्गी लावण्यासाठी व्हीजिट्स अन् बैठका**

**पिंपरी (दै. संध्या)**

सुमारे ४० लाख पिंपरी-चिंचवडकरांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत पाणी प्रश्नावर आगामी २५ वर्षांचे नियोजन करणे आणि शहराला ‘जलस्वयंपूर्ण’ करण्यासाठी भारतीय जनता पार्टी आग्रही पाठपुरावा करीत आहे. त्यासाठी महापौर रवि लांडगे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप यांच्यासह सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे आणि स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे आपआपल्या पातळीवर प्रभावशाली पाठपुरावा करीत आहेत.




पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या आंद्रा, भामा आसखेड पाणी पुरवठा योजनेच्या कामाची दोन दिवसांपूर्वी महापौर रवि लांडगे यांनी पाहणी केली. संबंधित ठेकेदाराचे काम प्रशासनाने रद्द केले आहे. त्या ठिकाणी नवीन ठेकेदार नियुक्ती करावा आणि नव्याने निविदा प्रक्रिया राबवावी, अशी सूचना त्यांनी प्रशासनाला दिली होती.

तत्पूर्वी, महाराष्ट्र विधिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये आमदार महेश लांडगे आणि आमदार शंकर जगताप यांनी शहराच्या आवश्यकतेनुसार, अतिरिक्त जलस्त्रोत निर्मिती, पवना बंद जलवाहिनी प्रकल्प सुरू करणे याबाबत राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. चासकमान धरणातून आणि मुळशी धरणातून शहरासाठी पाणी आरक्षीत करावे, अशी मागणी केली होती. विशेष म्हणजे, पवना धरणातून अतिरिक्त १०० एमएलडी पाणी आरक्षणासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मक आश्वासनही दिले आहे.

दरम्यान, महानगरपालिका अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा झाली. त्यावेळी शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी शहराचा पाणी पुरवठा आणि अपेक्षीत कार्यवाही यावर सभागृहात प्रभावी मागणी केली. सर्वसामान्य नागरिकांना पुरेसा पाणी पुरवठा करण्याबाबत भारतीय जनता पार्टी व आम्ही सर्व नगरसेवक कटिबद्ध आहोत. त्यासाठी प्रशासनाने सर्वोतोपरी कार्यवाही करावी, असे ठणकावले होते.

विशेष म्हणजे, प्रशासनाने सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये पाणी पुरवठा योजनांसाठी शून्य इतकी तरतूद होती. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी ही तरतूद ५० कोटींची केली आहे. त्यामुळे पाणी पुरवठा योजनांना चालना मिळणार असून, निर्धारित वेळेत प्रकल्प पूर्ण होणार आहेत.

महापौर रवि लांडगे म्हणाले की, सत्ताधारी भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी सातत्याने विविध स्तरावर आढावा बैठका, पाहणी दौरा करीत आहेत. तसेच, शहरातील भाजपा आमदार राज्य शासनाकडे प्रभावीपणे मागणी करीत आहेत. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे शहरातील प्रस्तावित पाणी पुरवठा योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सकारात्मक दबाव निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रशासन आता ‘अलर्ट मोड’ वर असून, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनीही पाणी पुरवठ्याच्या मुद्याला प्राधान्याने हातात घेतले आहे.

> पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रशासकीय काळात पाणी पुरवठा योजनांचे प्रकल्प रखडले आहेत. महापालिका सभागृहामध्ये आता लोकप्रतिनिधी आहेत. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या जीवनाशी निगडीत प्रमुख प्रश्न असलेल्या पाणी पुरवठाबाबत आम्ही संवेदनशील आहोत. पवना योजनेतील पाणी उपसा रावेत बंधाऱ्यातून आणि आंद्रा योजनेतील पाणी उपसा निघोजे बंधाऱ्यातून होतो. त्या ठिकाणी पाणी प्रदूषणाची गंभीर समस्या आहे. त्यासाठी टर्शरी ट्रिटमेंट प्लँट उभारणे आणि प्रस्तावित प्रकल्प कालबद्ध नियोजन करुन पूर्ण करणे, असे ध्येय आहे.
> **– प्रशांत शितोळे, सत्तारुढ पक्षनेता, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

> शहरातील प्रत्येक नागरिकाला स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा मिळणे, हा शहरवासीयांचा हक्क आहे. त्यासाठी पक्षाचे लोकप्रतिनिधी सक्षमपणे पाठपुरावा करीत आहेत. आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पाच्या पाहणीसाठी विरोधी पक्षनेतासुद्धा आले होते. या प्रकल्पाच्या जुन्या ठेकेदाराने ४ वर्षे प्रकल्प रखडवला. त्याच्या कामाला स्थगिती दिली आहे. नवीन निविदा प्रक्रिया राबवून ८ महिन्यांमध्ये सदरचे काम पूर्ण करण्यात येईल. त्यामुळे १६७ एमएलडी पाणी शहराला मिळणार आहे.
> **– रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

> पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या आणि पाण्याची मागणी याचा विचार करता अतिरिक्त जलस्त्रोत निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आंद्रा, भामा आसखेड प्रकल्प, पवना बंद जलवाहिनी प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू करणे. नवीन जलस्त्रोत निर्माण करुन पाणी पुरवठा यंत्रणा सक्षम करण्यासाठी आम्ही आग्रही आहोत. त्यासाठी महापालिका, राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडेही पाठपुरावा करण्यात येत आहे. आगामी काळात पाण्यासाठी पिंपरी-चिंचवड आत्मनिर्भर होईल, असा विश्वास आहे.
> **– शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

> पिंपरी-चिंचवडकरांना पाणी पुरवठा सक्षमपणे देण्याकामी आम्ही प्रयत्नशील आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे यांच्या सहकार्याने तसेच महापालिकेतील महापौर, सत्तारुढ पक्षनेते यांच्या नेतृत्त्वामध्ये आम्ही पाणी पुरवठा योजनांना पहिले प्राधान्य दिले आहे. अर्थसंकल्पात पाणी योजनांना निधी कमी पडणार नाही. त्यामुळे संबंधित प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण होतील, यात शंका नाही.
> **– अभिषेक बारणे, अध्यक्ष, स्थायी समिती, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता; हजारो भाविकांची उपस्थिती

मंचर (दैनिक संध्या) : आदर्शगाव गावडेवाडी येथे रामनवमी ते हनुमान जयंती दरम्यान आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची शुक्रवार दि. ३ रोजी सांगता झाली.सकाळी चेतन महाराज बांगर यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाचा समारोप झाला.यावेळी भाविकांनी उपस्थित राहून भक्तिमय वातावरणाचा अनुभव घेतला. ग्रामस्थ, तरुण वर्ग आणि महिला भगिनी यांच्या संयुक्त प्रयत्नातून संपूर्ण सप्ताहाचे नियोजन करण्यात आले होते.पुणे, मुंबईसह विविध भागांतून भाविकांनी हजेरी लावली.या सप्ताहातील विशेष आकर्षण ठरले ते मासवडीच्या जेवणाचे आयोजन. सुमारे एक हजार महिलांनी प्रत्येकी तीन भाकऱ्या आणत तब्बल तीन हजार भाकऱ्यांचा महाप्रसाद तयार केला. महिलांनी एकत्र येत मासवडी व झणझणीत रस्सा बनवून भाविकांना स्वादिष्ट जेवणाचा आनंद दिला.भाकरी आणणाऱ्या महिलांसाठी वीस पैठणी साड्यांचा लकी ड्रॉ काढण्यात आला होता.याशिवाय दररोज पाण्याचा जार व पेरू झाडाचे रोप अशा विविध भेटवस्तूंचेही वितरण करण्यात आले. त्यामुळे महिला वर्गात विशेष उत्साह पाहायला मिळाला. दरम्यान,सालाबादप्रमाणे भैरवनाथ महाराज यात्रा उत्सव सोमवार दि. ६ व मंगळवार दि.७ रोजी होणार असून, भाविकांनी उपस्थित राहून यात्रेची शोभा वाढवावी, असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### युवासेनेचा संघटन दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारी लांडेवाडी येथे बैठक

मंचर (दैनिक संध्या) : शिरूर लोकसभा मतदारसंघात युवासेनेच्या "महाराष्ट्र युवासंघटन दौऱ्या"च्या पार्श्वभूमीवर युवासेना पदाधिकारी व युवासैनिकांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे.सोमवार दि.६ रोजी सकाळी ११ वाजता लांडेवाडी ता.आंबेगाव येथे ही बैठक पार पडणार आहे.अशी माहिती युवासेनेचे कार्यकारिणी सदस्य सचिन बांगर यांनी दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तसेच खासदार डॉ.श्रीकांत शिंदे आणि युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार दि.१८ एप्रिल रोजी मुंबई येथे होणाऱ्या युवासेना मेळाव्याच्या तयारीसाठी हा दौरा सुरू आहे.या अनुषंगाने जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जुन्नर, आंबेगाव-शिरूर, खेड-आळंदी, शिरूर-हवेली व भोसरी या विधानसभा मतदारसंघांतील पदाधिकारी व युवासैनिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.लांडेवाडी येथील शिवसेना युवानेते रमेशभाऊ येवले यांच्या शिवसेना मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात ही बैठक होणार असून, यावेळी युवासेना सचिव किरण साळी, विभागीय सचिव विश्वजीत बारणे आणि कार्यकारिणी सदस्य सचिन बांगर यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे सांगण्यात आले.

### पोंदेवाडीत गडदादेवी सोसायटीमार्फत अडीच कोटीं रुपयाचे पीक कर्ज वाटप

मंचर (दैनिक संध्या) : आंबेगाव तालुक्यातील पोंदेवाडी येथे गडदादेवी सेवा सहकारी सोसायटीच्या माध्यमातून सभासद शेतकऱ्यांना सुमारे अडीच कोटी रुपयांचे पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे.उर्वरित सभासदांनाही लवकरच कर्ज वाटप पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती सोसायटीचे अध्यक्ष विठ्ठल मखर यांनी दिली. पावसाळा तोंडावर आल्यामुळे खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक मदत मिळावी, यासाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री व जिल्हा बँकेचे संचालक स्वर्गीय अजित पवार, जिल्हा बँकेचे जेष्ठ संचालक आणि माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून बँकेने शून्य टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे. सध्या विविध बँकांकडून सोसायटींमार्फत कर्ज वाटपाची प्रक्रिया वेगाने सुरू असून गडदादेवी सोसायटीने यामध्ये पुढाकार घेतला आहे.या उपक्रमा अंतर्गत आतापर्यंत सुमारे ६३ सभासदांना त्यांच्या जमीन क्षेत्रानुसार कर्ज वितरित करण्यात आले आहे. एकूण अडीच कोटी रुपयांचे कर्ज वाटप झाल्याची माहिती आंबेगाव तालुका खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष अनिल वाळुंज व वसंतराव रोडे यांनी दिली. दरम्यान, पारगाव शाखेचे जिल्हा बँकेचे अधिकारी ए.एस. शिंदे, सोसायटीचे सचिव रोहिदास जोरी आणि सेवक ओंकार पोंदे यांनी कागदपत्रांची पूर्तता करून तातडीने कर्ज वाटप केल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

### माळेगावात विजेच्या धक्क्याने एकाचा मृत्यू

माळेगाव (दैनिक संध्या) : माळेगाव येथील ढगाईमातानगरमधील केबल व्यावसायिक राहुल ऊर्फ पप्पू नारायण जगताप (वय ४५) यांचा गुरुवारी (ता. २) संध्याकाळी विजेच्या तीव्र धक्क्याने मृत्यू झाला. वादळी पावसामुळे तुटलेली केबल दुरुस्त करताना ही दुर्दैवी घटना घडली. माळेगाव (ता. बारामती) परिसरात गुरुवारी जोरदार वाऱ्यासह गारांचा पाऊस झाला. यामुळे राजे अमरसिंह कॉलनीतील केबलची वायर तुटली होती. ही वायर दुरुस्त करत असताना अचानक विद्युत प्रवाह उतरल्याने राहुल जगताप यांना विजेचा तीव्र धक्का बसला. त्यांना उपचारासाठी बारामतीला नेत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी युवराज सदाशिव जेधे यांनी माळेगाव पोलिस ठाण्यात खबर दिली असून, पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, वडील आणि भाऊ असा परिवार आहे.

### दुहेरी खुनातील आरोपीस अटक

आळंदी (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील केळगाव ठाकरवाडी येथील वृद्ध महिला आणि सहा वर्षांच्या मुलीच्या दुहेरी खून प्रकरणाचा छडा लावण्यात आळंदी पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी विनायक तुकाराम भवारी (वय ३२, रा. सिन्नर) याला आळेफाटा येथून अटक करण्यात आली आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक भीमा नरके यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (ता. २) मध्यरात्री मंगल शिंदे आणि धनश्री केदारी (वय ६) यांचा राहत्या घरी खून झाला होता. आरोपी विनायक भवारी आणि धनश्रीची आई संगीता केदारी यांनी दोन वर्षांपूर्वी प्रेमविवाह केला होता. मात्र, कौटुंबिक वादामुळे ते महिनाभरापासून वेगळे राहत होते. आरोपी वारंवार घरी येत असल्याने मंगल शिंदे त्याला जाब विचारत असत, तर चिमुरडी धनश्रीही त्याला विरोध करत असे. याच रागातून आरोपीने गुरुवारी मध्यरात्री प्रथम मंगल शिंदे यांच्यावर हल्ला केला. यावेळी धनश्रीने आरडाओरड केल्याने आरोपीने तिचाही गळा आवळून खून केला. सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे अवघ्या सहा तासांत आरोपीला आळेफाटा परिसरातून ताब्यात घेण्यात आले. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून, आळंदी पोलिस पुढील तपास करत आहेत.

### गाय बाजारात 55 लाखांची उलाढाल

आळेफाटा (दैनिक संध्या) : जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आळेफाटा उपबाजारात गुरुवारी झालेल्या गाईंच्या लिलावात ५५ लाख रुपयांची उलाढाल झाली. बाजारात आलेल्या ३६५ संकरित गाईंपैकी २६७ गाईंची विक्री झाल्याची माहिती बाजार समितीचे सभापती संजय काळे यांनी दिली. पुणे जिल्ह्यातील चाकणनंतरचा हा सर्वात मोठा बाजार समजला जातो. येथे अहिल्यानगर, नाशिक आणि ठाणे जिल्ह्यातून शेतकरी गाईंच्या खरेदी-विक्रीसाठी येतात. सध्या पावसामुळे चारा उपलब्ध असल्याने गाईंना मोठी मागणी आहे.

# निरा नदीत प्रदूषणाचा कहर; लाखो मासे मृत

## कोऱ्हाळे खुर्द परिसरात मासे तडफडून मृत; प्रदूषणामुळे शेतीवरही परिणाम

**बारामती (दै. संध्या)**



बारामती तालुक्यातील कोऱ्हाळे खुर्द येथील निरा नदीचे पाणी कमालीचे प्रदूषित झाले आहे. त्यामुळे लाखो मासे मृत झाले आहेत. पात्रालगत या माशांचा अक्षरश: खच पडला, तर पात्रातही हजारो मासे तडफडताना दिसतात. मृत माशांमुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे. या पाण्यामुळे शेती नापीक होत आहे. कोऱ्हाळे खुर्द येथे बंधाऱ्याच्या वरच्या बाजूस पाणी अतिशय अस्वच्छ बनले आहे. या पाण्याने शेती नापीक होत आहे. एकेकाळी पिण्यास योग्य असलेले निरेचे पाणी आता पूर्णतः खराब झाल्याची खंत ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. साखर कारखाना तसेच फलटण तालुक्यातील विविध कंपन्या, नाले, ओढे आणि औद्योगिक सांडपाण्यामुळे नदीचे प्रदूषण वाढत असल्याचा आरोप शेतकरी करीत आहेत. कांबळेश्वर, सांगवी, शिरवली, खांडज, निरावागज या भागातील प्रदूषणाबाबत फलटण तालुक्यातील कत्तलखाने व दूध प्रक्रिया उद्योगांकडे बोट दाखविले जाते. मात्र, कोऱ्हाळे खुर्द व होळ परिसरातच ही स्थिती निर्माण झाल्याने साखर कारखाना व इतर उद्योगांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. यापूर्वी केंद्रीय राज्यमंत्री प्रल्हाद पटेल यांनी निरा नदीच्या प्रदूषणाची पाहणी केली होती तसेच खासदार शरद पवार यांनीही निरावागज परिसरात निरेच्या प्रदूषणाची पाहणी केली होती. परंतु, उपाययोजना मात्र होताना दिसत नाही.

**प्रदूषण मंडळाचे दुर्लक्ष**

नदीतील माशांचा जीव वाचविण्यासाठी तातडीने उपाययोजना होणे आवश्यक आहे. मात्र कोणत्याही शासकीय यंत्रणेने अद्याप ठोस पावले उचललेली नाहीत. प्रदूषण नियंत्रणासाठी स्थापन करण्यात आलेल्या कार्यालयाकडूनही अपेक्षित कार्यवाही होत नाही.

## पुरोगामी विद्यालयात विद्यार्थ्यांना दिले ड्रोन प्रशिक्षण

**हवेली (दै. संध्या)**



विद्यार्थ्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण आनंददायी शनिवार अंतर्गत शनिवार दिनांक ४/४/२०२६ रोजी देण्यात आले. रोटरी क्लब ऑफ मगरपट्टा सिटी यांच्या सहकार्याने हा उपक्रम विद्यालयात राबविण्यात आला. ड्रोना ऍव्हियेशन इन्स्टीट्यूट यांच्या तर्फे विद्यार्थ्यांना ड्रोन निर्मिती,ड्रोनचे उपयोग व ड्रोन चालविणे बाबत प्रशिक्षण देण्यात आले. व विद्यार्थ्यांच्या कडून ड्रोन चालविण्याचे प्रात्यक्षिके करून घेतली.या प्रशिक्षणात इ ७वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. या उपक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ मगरपट्टा सिटी चे प्रेसिडेंट समीर यादव कॅप्टन मिलिंद शिंदे रोटरीयन राजीव राय,रोटरीयन जितेंद्र प्रधान,रोटरीयन सुर्यकांत चौधरी हे उपस्थित होते.तर दिनेश सेन व अक्षय कुमार यांनी प्रात्यक्षिके व माहिती सांगितली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप थोपटे यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव रंगनाथ आप्पा कड यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

## कच्चा माल महागल्याने बेकरी पदार्थांचे दर वाढले; ग्राहकांवर ताण



**मंचर (दै. संध्या)**

युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता स्थानिक बाजारपेठेत स्पष्टपणे जाणवू लागला असून, बेकरी व्यवसायासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे.यामुळे पाव, बटरसह विविध बेकरी पदार्थांचे दर वाढल्याने ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक ताण पडत आहे. बेकरी व्यवसायिकांच्या मते, साखर, खाद्यतेल, गॅस, वीज आणि इंधनाच्या दरात झालेल्या वाढीमुळे उत्पादन खर्चात लक्षणीय वाढ झाली आहे. साखरेच्या ५० किलो पोत्यामागे सुमारे १०० रुपयांची वाढ झाली आहे, तर खाद्यतेलाच्या डब्यावर २०० ते २५० रुपयांची वाढ झाली आहे.याशिवाय गॅस आणि विजेचे वाढलेले दरही व्यवसायिकांना झळ पोहोचवत आहेत. ग्रामीण भागात गॅस व इंधन महाग झाल्यामुळे काही ठिकाणी लाकडाचा वापर वाढला आहे.मात्र, वाढत्या मागणीमुळे लाकडाचे दरही वाढले आहेत. त्यामुळे बेकरी उत्पादनाचा एकूण खर्च वाढल्याने व्यवसायिकांना दर वाढवण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

या परिस्थितीमुळे ग्राहकांना अधिक पैसे मोजावे लागत असून, बेकरी व्यवसायिक आणि किरकोळ विक्रेते दोघेही आर्थिक ताणाखाली आले आहेत.

कच्चा माल सतत महाग होत असल्यामुळे उत्पादन खर्च वाढला आहे. साखर, तेल यांचे दर वाढल्याने आम्हाला दर वाढवावे लागले.अन्यथा व्यवसाय चालवणे अशक्य होईल.

**- शेखर चौधरी, बेकरी पदार्थ विक्रेते मंचर**

"साखर, तेल आणि इतर वस्तूंचे दर वाढल्यामुळे ग्राहकांकडून नाराजी व्यक्त होत आहे.आम्हालाही वाढलेल्या दराने माल खरेदी करावा लागतो, त्यामुळे कमी दरात विक्री करणे शक्य नाही.

**- सोमनाथ खुडे, खुडे किराणा मंचर.**

## विहिरीत पडलेल्या बिबट्याची वनविभाग व ग्रामस्थांच्या मदतीने सुटका

**मंचर (दै. संध्या)**



आंबेगाव तालुक्यातील पिंपळगाव - खडकी येथे शुक्रवारी (ता. ३) पहाटे विहिरीत पडलेल्या बिबट्याची वनविभागाच्या पथकाने ग्रामस्थांच्या मदतीने सुखरूप सुटका केली. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

शिवाजी ठकाजी बांगर यांच्या शेतातील विहिरीत हा बिबट्या पडल्याचे आढळून आले. राजेंद्र निवृत्ती बांगर व स्वप्निल शिवाजी बांगर हे नेहमीप्रमाणे जनावरांसाठी चारा आणण्यासाठी शेतात गेले असता त्यांना अचानक गुरगुरण्याचा आवाज ऐकू आला. आवाजाचा माग काढत त्यांनी विहिरीत डोकावून पाहिले असता, विहिरीच्या कपारीत बसलेला बिबट्या दिसून आला. हे दृश्य पाहून त्यांची घाबरगुंडी उडाली.

घटनेची माहिती तत्काळ वनपाल सोनल भालेराव यांना देण्यात आली. त्यानंतर मंचर वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक पाहणीत संबंधित बिबट्या अंदाजे अडीच वर्षांचा असल्याचे स्पष्ट झाले.

विहिरीत पडल्यामुळे बिबट्या घाबरलेला होता व बाहेर पडण्याचा प्रयत्न करत होता. वनविभागाने आवश्यक ती खबरदारी घेत पिंजरा विहिरीत सोडून बिबट्याला विहिरीतून बाहेर काढण्यात यश आले.त्यानंतर त्याची वैदकीय तपासणी करून मानिक डोह बिबट निवारण केंद्रात दाखल केले आहे.

या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असून, वाढत्या वन्यप्राण्यांच्या वावराचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## निमगाव सावा येथे रंगला 'खो-खो'चा थरार

**खोडद (दै. संध्या)**

निमगाव सावा (ता. जुन्नर) येथील दिलीप वळसे पाटील महाविद्यालयामध्ये राज्यस्तरीय शालेय खो-खो स्पर्धेत १२ संघांनी (मुले, मुली) सहभाग नोंदवत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. वेगवान चढाया, अचूक बचाव आणि रणनीतीपूर्ण खेळ यामुळे स्पर्धा रंगतदार झाली. श्री पांडुरंग स्पोर्ट क्लब यांच्या सहकार्याने आयोजित या स्पर्धेच्या उद्घाटनावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष पांडुरंग पवार, प्रशिक्षक शिरीन गोडबोले, आंतरराष्ट्रीय पंच किरण वाघ, राष्ट्रीय खेळाडू नरेश अग्रवाल, संस्थेचे अध्यक्ष संदीपान पवार, प्राचार्य प्रल्हाद शिंदे आदी उपस्थित होते. मुलांच्या गटात इंदापूरच्या (जंक्शन) नंदिकेश्वर विद्यालयाने निमगाव सावा येथील दिलीप वळसे पाटील महाविद्यालयाला पराभूत करीत विजय मिळवला. तर, मुलींच्या गटात चिंचवडच्या श्रीमती गेंदीबाई ताराचंद चोपडा विद्यालयाने वरकुटेच्या श्री शिवाजी विद्यालयावर मात केली. विजेत्या संघांना अनुक्रमे अकरा हजार १११ ते पाच हजार ५५५ रुपये अशी रोख रक्कम, चषक, प्रमाणपत्र व पदके देऊन गौरविण्यात आले.

## ग्रामपंचायत कर्मचारी जाळ्यात

**शिक्रापूर (दै. संध्या)**

शिरूर तालुक्यातील कान्हूर मेसाई ग्रामपंचायतीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेताना रंगेहाथ पकडले. भरत पोपट गायकवाड असे त्याचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध शिक्रापूर पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कान्हूर मेसाई येथील तक्रारदाराच्या जागेवर काही व्यक्तींनी अतिक्रमण करून घर उभारले होते. या प्रकरणात संबंधितांनी ग्रामसेवकाकडून नियमबाह्य पद्धतीने 8-अ उतारा तयार करून घेतल्याचा आरोप आहे. याबाबत न्याय मिळावा म्हणून तक्रारदाराने शिरूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे अर्ज केला होता. या अर्जाची चौकशी करून अहवाल वरिष्ठांकडे पाठविण्यासाठी गायकवाड याने तक्रारदाराकडे थेट 10 ते 15 हजार रुपयांची लाच मागितली. लाच स्वतःसाठी आणि ग्रामसेवकासाठी असल्याचेही त्याने स्पष्ट केले होते, अशी माहिती तपासात उघड झाली आहे. याबाबत तक्रारदाराने पुणे येथील लाचलुचपत विभागाकडे तक्रार दाखल केली.

## सारोळ्यात सीएनजी पाइपलाइनवरून वाद; उल्लंघन केल्याचा आरोप

**सारोळा (दै. संध्या)**



भोर तालुक्यातील सारोळा येथे टोरेंट सीएनजी पंप व डेपो होत असल्यामुळे सीएनजी वाहनाना इंधन मिळण्याची मोठी सुविधा मिळणार आहे. मात्र, सारोळा येथील सीएनजी पंप सोबत डेपो असल्यामुळे महामार्गावर पुण्याच्या दिशेने उजव्या बाजूने 19.4 किलोमीटरपर्यंत टोरेंट कंपनी सीएनजी गॅससाठी ही वाहिनी उभारत आहे. महामार्ग ओलांडण्यासाठी महामार्ग प्राधिकरणाकडून औपचारिक मंजुरी मिळवली आहे. महामार्गाच्या सेवारस्त्याला खेटूनच वाहिनी उभारण्याचे काम सुरू असल्याने नियमांची पायमल्ली होत असली तरी बेकायदेशीररीत्या खुलेआम काम रेटून नेले जात आहे. भविष्यात गॅसगळती अथवा काही कारणाने वाहिनी फुटल्यास अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय (एमओआरटीएच) व पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू नियामक मंडळाच्या नियमावलीनुसार महामार्गाचा सेवारस्ता सोडून 21 फुट पुढे वाहिनी गाडणे असणे गरजे आहे. त्याचबरोबर स्थायी इमारती पासून 15 मीटर अंतर ठेवणे गरजेचे असताना महामार्गाच्या सेवारस्त्या लगत अथवा एक ते तीन फुटांच्या अंतरावरून नेली जात आहे. सध्या सुरू असलेले काम तत्काळ थांबवून कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्याची गरज आहे. गॅस कंपनी सर्वसामान्यांना वेठीस धरण्याचे काम करीत आहे. महामार्गावरील वाहतूक व स्थानिक नागरिकांच्या सुरक्षता महत्त्वाची आहे, असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.

# पणदरे पंचक्रोशीतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीची मागणी

**शिवनगर (दै. संध्या)**



बारामती तालुक्यातील पश्चिम भागातील धुमाळवाडी, पवईमाळ तथा पणदरे पंचक्रोशीतील शेतकऱ्यांचे वादळी वाऱ्यासह गारपिटीने झालेले प्रचंड नुकसान झाल्याने या शेतकऱ्यांना भरघोस मदत करावी, या मागणीसाठी माळेगाव कारखान्याचे संचालक योगेश जगताप यांनी थेट कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याशी फोनवर संवाद साधला. यावेळी भरणे यांनी देखील उपस्थित असलेल्या कृषी तथा मंडल अधिकारी यांना ताबडतोब पंचनामे करून अहवाल पाठवण्याचे निर्देश देऊन जास्तीची मदत करण्याचे आश्वासन दिले.

योगेश जगताप यांनी बुधवारी वादळी वाऱ्यासह गारपिटीने झालेल्या पणदरे पंचक्रोशीतील नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष संदीप बांदल, कारखान्याचे माजी संचालक अनिल तावरे, उदयसिंह धुमाळ, ॲड. रवींद्र माने, सरपंच बाळासाहेब कोकरे, अतुल जगताप, संदीप जगताप, रोहन जगताप, कृषी अधिकारी सचिन हाके, मनीषा यादव, अप्पासाहेब झंजे, शिवप्रसाद जाधव आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित असलेल्या ग्रामस्थांसह शेतकऱ्यांनी योगेश जगताप यांच्या संवेदनशीलतेचे कौतुक करून संकटाच्या काळात मदतीला धावून येणारा नेता असल्याची भावना व्यक्त केली.

बळीराजावर आलेले हे संकट मोठे आहे. पिकांचे पंचनामे तातडीने पूर्ण करून शासनाकडून आणि संबंधित विभागाकडून जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी आपण पाठपुरावा करणार आहोत. नुकसानीच्या या काळात एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल. **- योगेश जगताप, संचालक, माळेगाव साखर कारखाना**




# माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव : आरोग्य समृद्ध महाराष्ट्राची लोकचळवळ

**महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला असून या राज्यव्यापी अभियानाला एप्रिलपासून प्रारंभ करण्यात आला आहे.**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने जिल्हास्तरीय पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरिता श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय, सामान्य रुग्णालय येथे आयोजित 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' विभागीय कार्यशाळेचे सहभागी झाले होते. हे अभियान फक्त सरकारी कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लोकसहभागाद्वारे त्यातून एक व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी, असा राज्य शासनाचा मानस आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न केले जाणार आहे. या प्रस्तावित योजनेमुळे गावापासून ते राज्यस्तरावरील आरोग्य सेवांचे आणि यंत्रणांचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे तळागाळातील लोकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचणार आहेत. 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधावर भर, हे आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवून आणणे आणि त्यांच्यात आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये फक्त आजारांवर उपचार करण्यापेक्षा ते होऊ नयेत यासाठी सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि पोषण यासारख्या मूलभूत घटकांवरही विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. संसर्गजन्य आजारांसोबतच बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणारे असंसर्गजन्य आजार, माता-बाल आरोग्य आणि मानसिक आरोग्य यासारख्या विषयांनाही या मोहिमेत सामावून घेण्यात आले आहे. या अभियानात ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदेच्या आरोग्य यंत्रणा सक्रियपणे सहभागी होणार आहेत. गावागावात स्वच्छतेचा आणि आरोग्याचा जागर करून आरोग्यदायी गाव ही संकल्पना राबवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असणार आहे.

**सुदृढ गावांना मिळणार 'आरोग्यसंपन्न गाव' किताब:** 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरापासून ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत तीन टप्प्यांवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती ही अभियानाच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवणार आहे.

तर आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांच्या नेतृत्वाखालील कृती समिती प्रत्यक्ष कामाचे नियोजन करणार आहे. त्याचबरोबर गाव पातळीवर आरोग्याचे मूल्यांकन करण्यासाठी विशिष्ट निकष ठरवण्यात आले आहेत. या निकषांच्या आधारे ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या गावांना 'आरोग्यसंपन्न गाव' म्हणून गौरविण्यात येणार आहे. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रकमेचा पुरस्कार देऊन प्रोत्साहित केले जाणार आहे. या संपूर्ण अभियानासाठी राज्य सरकारने ८०.७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, गाव, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना कोट्यवधी रुपयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत.

**दोन ते पाच कोटींचे पुरस्कार:** राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करीत पहिला क्रमांक मिळवणाऱ्या जिल्हा परिषदेला ५ कोटी रुपये, दुसऱ्या क्रमांकाला ३ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकासाठी २ कोटी रुपये दिले जाणार आहेत. जिल्हा परिषदेनंतर पंचायत समिती स्तरावरही प्रोत्साहनासाठी मोठ्या रक्कमेची तरतूद आहे. ज्यामध्ये पहिल्या क्रमांकाला २ कोटी, दुसऱ्या क्रमांकाला १.५ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकाला १.२५ कोटी रुपये दिले जाणार आहेत.

राज्यस्तरावर सर्वोत्तम ठरणाऱ्या ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालयांना ७५ लाख रुपयांचा विशेष पुरस्कार दिला जाणार आहे. उपआरोग्य केंद्रांना पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा आणि राज्यस्तरासाठी अनुक्रमे ५ लाख आणि २५ लाख रुपये दिले जाणार आहे. तर प्राथमिक आरोग्य केंद्रांना जिल्हा स्तरावर १० लाख आणि राज्य स्तरावर ५० लाखांचा पुरस्कार दिला जाणार आहे. त्याचबरोबर गावांनाही पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा, विभाग राज्य स्तरासाठी अनुक्रमे २५ लाख, १ कोटी आणि ५ कोटी रुपयांचे पुरस्कार दिले जाणार आहेत. हे अभियान दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षाच्या कालावधीत राबवले जाणार असल्याने, प्रत्येक वर्षी गावांना आपली कामगिरी सुधारण्याची आणि पुरस्कार मिळवण्याची संधी मिळणार आहे.

■ संकलन-जिल्हा माहिती कार्यालय, पुणे ■



# रोज दूध प्यायल्याने वाईट कोलेस्ट्रॉल कमी होते का?

अलीकडच्या काळात, अनेक लोक चरबीच्या (कोलेस्ट्रॉलच्या) समस्येने त्रस्त आहेत. यामुळे त्यांचं वजन झपाट्याने वाढत आहे. अशा समस्येचा सामना करणारे लोक काही खाण्यापूर्वी दोनदा विचार करतात. काही खाल्ल्यास कोलेस्ट्रॉल आणखी वाढेल काय या शंकेने ग्रासलेले असतात. या यादीत दुधाचा क्रमांक पहिला लागतो. उच्च चरबीचा त्रास असलेले लोक रोज दूध पिऊ शकतात का? रोज दूध प्यायल्यास काय होईल? चला आता अभ्यासाच्या अहवालातून मिळालेले उत्तर जाणून घेऊया....

दुधातील पोषक तत्वे: दूध हा एक परिपूर्ण आहार मानला जातो. त्यात कॅल्शियम, जीवनसत्त्वे ए, बी२, बी12, डी, तसंच खनिजे असतात. काही लोकांना दररोज दूध पिणं आवडते. एक कप दुधात सुमारे 150 कॅलरीज, 8 ग्रॅम प्रथिने आणि ८ ग्रॅम चरबी असते. कोलेस्ट्रॉलची समस्या असलेले लोक दररोज एक कप स्किम्ड मिल्क पिऊ शकतात. कारण स्किम्ड मिल्कमध्ये सुमारे 66 कॅलरीज कमी असतात. चरबीचे प्रमाण अगदी कमी असते. प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे अजिबात कमी होत नाहीत.

अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या मते, ज्यांना कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करायची आहे, त्यांनी दररोज 12 ग्रॅमपेक्षा कमी सॅचुरेटेड फॅट्सचं सेवन करावं. ज्यांना औषधांशिवाय कोलेस्ट्रॉल कमी करायचे आहे, त्यांनी आहाराच्या बाबतीत अशा स्वयं-नियमांचे निश्चितपणे पालन करावं, असा सल्ला दिला जातो.

वाईट कोलेस्ट्रॉल विरुद्ध चांगले कोलेस्ट्रॉल. 2018 मध्ये 'युरोपियन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशन' मध्ये एक अभ्यास प्रकाशित झाला होता. यानुसार, अभ्यासातील काही सहभागींनी तीन आठवडे दररोज स्किम्ड मिल्क (मलईविरहित दूध) पिलं तर इतरांनी नियमित दूध (पूर्ण फॅटचे दूध) सेवन केलं. तीन आठवडे झाल्यानंतर, यात एक लहान बदल करण्यात आला. जे स्किम्ड मिल्क पित होते, त्यांनी नियमित दूध पिण्यास सुरुवात केली. जे लोक पूर्ण फॅट दूध पित होते त्यांनी तीन आठवडे स्किम्ड मिलं पिलं. ज्यांनी नियमित दूध पिलं, तेव्हा त्यांच्या चांगल्या कोलेस्ट्रॉलची (HDL) पातळी वाढली. मात्र, स्किम्ड मिल्क पिणाऱ्यांमध्ये किंवा पूर्ण फॅटचे दूध पिणाऱ्यांमध्ये वाईट कोलेस्ट्रॉलची वाढ झाली नाही. यावरून दुधामुळे वाईट कोलेस्ट्रॉल वाढत नाही असं यावरून सिद्ध होते.

2022 मध्ये 'PLOS One' या जर्नलमध्ये एक अभ्यास अहवाल प्रकाशित झाला. त्यात मुलांमधील लठ्ठपणा कमी करण्यासाठी पाळल्या जाणाऱ्या आहाराचा उल्लेख केला आहे. अभ्यासात सहभागी झालेल्या काही मुलांना हिरव्या भाज्या, बीफ आणि डेअरी बटर यांसारखे कमीत कमी प्रक्रिया केलेले पदार्थ देण्यात आले. तसंच त्यांना दररोज सरासरी 10 औंस साधे दूध देण्यात आलं. या अभ्यासात सहभागी झालेल्या दुसऱ्या गटातील मुलांना नियमित अन्न देण्यात आलं.

काही महिन्यांनंतर, दुसऱ्या गटातील मुलांनाही कमीत कमी प्रक्रिया केलेले पदार्थ देण्यात आले. या अभ्यासात असं दिसून आलं की दुसऱ्या गटातील मुलांमध्ये चांगल्या कोलेस्ट्रॉलच्या (HDL) पातळी लक्षणीय वाढ झाली. इतकेच नाही, तर त्यांचे कोलेस्ट्रॉल/एचडीएल कोलेस्ट्रॉल गुणोत्तरही कमी झाले.



# गुणवत्तेच्या नावाखाली संधींचे केंद्रीकरण आणि वाढती शैक्षणिक विषमता

**महाराष्ट्रातील उच्च शिक्षण व्यवस्था, सामाजिक न्यायाची परंपरा आणि सर्वसमावेशक विकासाचा विचार करता, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेला शासन आदेश हा केवळ एक प्रशासकीय निर्णय नसून, तो राज्याच्या शैक्षणिक व सामाजिक संरचनेवर दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो. या शासन आदेशामध्ये शिक्षक किंवा प्राध्यापक भरती किंवा शैक्षणिक पात्रतेचे मूल्यांकन करताना उमेदवाराने शिक्षण घेतलेल्या विद्यापीठाच्या किंवा संस्थेच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) क्रमांकाचा विचार करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, परदेशी विद्यापीठांच्या बाबतीत QS, THE आणि ARWU (Shanghai) या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना पहिल्या गटामध्ये ठेवण्याचा किंवा प्राधान्य देण्याचा निकष लागू करण्यात आलेला आहे. वरकरणी पाहता हा निर्णय गुणवत्ता आणि आंतरराष्ट्रीय दर्जा वाढविण्याच्या हेतूने घेतलेला वाटतो; मात्र वास्तवात तो सामाजिक विषमता वाढविणारा आणि वंचित घटकांना दुय्यम स्थान देणारा असल्याचे दिसून येते.**

महाराष्ट्रातील शैक्षणिक वास्तवाचा विचार केला असता, NIRF १०० च्या आत सातत्याने स्थान मिळवणारी सार्वजनिक विद्यापीठे म्हणजे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ ही प्रामुख्याने पुढे येतात. याचा सरळ अर्थ असा होतो की राज्यातील लाखो विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची व्याख्या केवळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ या दोन विद्यापीठांपुरती मर्यादित केली जाते. परंतु हा दृष्टिकोन वास्तवापासून पूर्णतः दूर आहे. कारण महाराष्ट्रातील बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण, आदिवासी, दलित आणि बहुजन समाजातून येतात, ज्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत मर्यादित असते. अशा विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ सारख्या विद्यापीठांमध्ये जाऊन शिक्षण घेणे हे केवळ प्रवेश मिळवण्यापुरते मर्यादित नसून, ते आर्थिक, सामाजिक आणि मानसिक संघर्षांचे एक मोठे आव्हान असते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती पाहिली असता, त्यांना दरमहा होणारा खर्च परवडणेही कठीण असते. पुणे किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये राहण्यासाठी लागणारे भाडे, अन्न, प्रवास, शिक्षण शुल्क, पुस्तके आणि इतर आवश्यक खर्च यांचा एकत्रित विचार करता, हा खर्च हजारो रुपयांपर्यंत पोहोचतो. अशा परिस्थितीत गरीब, आदिवासी किंवा बहुजन कुटुंबातील विद्यार्थ्यांनी या शहरांमध्ये जाऊन शिक्षण घेणे हे जवळजवळ अशक्य ठरते. त्यामुळे शासन आदेशामध्ये नमूद केलेला निकष प्रत्यक्षात या विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या मुख्य प्रवाहातून बाहेर ढकलतो.

या शासन आदेशाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे परदेशी विद्यापीठांच्या संदर्भातील निकष. QS, THE आणि ARWU (Shanghai) या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणे ही गोष्ट केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम विद्यार्थ्यांसाठीच शक्य आहे. परदेशात शिक्षण घेण्यासाठी लागणारा खर्च हा लाखो रुपयांमध्ये असतो. यामध्ये केवळ शिक्षण शुल्कच नव्हे, तर राहणीमानाचा खर्च, प्रवास, व्हिसा, विमा आणि इतर अनेक खर्चांचा समावेश असतो. त्यामुळे गरीब किंवा सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी हा पर्याय व्यवहार्य नाही. अशा परिस्थितीत शासनाने हा निकष लावणे म्हणजे सामाजिक विषमता अधिकच वाढविण्याचा मार्ग मोकळा करणे होय.

याचबरोबर, या शासन आदेशातील सर्वात मोठी विसंगती म्हणजे त्याचा कालबाह्य वापर. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) ही प्रणाली भारतात २०१६ पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे २०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाच्या काळात या क्रमवारीचा कोणताही संबंध नव्हता. अशा विद्यार्थ्यांवर हा निकष लागू करणे म्हणजे त्यांच्या संधींवर अन्याय करणे होय. हा प्रकार न्याय आणि समानतेच्या मूलभूत तत्त्वांना विरोध करणारा आहे. कोणताही नियम तो लागू होण्यापूर्वीच्या कालावधीवर लावणे हे प्रशासनिक दृष्ट्या चुकीचे मानले जाते, आणि येथेही तीच चूक स्पष्टपणे दिसून येते.

या निर्णयामुळे राज्यातील इतर विद्यापीठांचे अवमूल्यन होण्याची प्रक्रिया सुरू होते. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील अनेक विद्यापीठे ही लाखो विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची प्रमुख साधने आहेत. या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येतात आणि अनेकदा उत्कृष्ट यश संपादन करतात. मात्र त्यांच्या विद्यापीठाचा NIRF क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना कमी गुण दिले जातात. यामुळे त्यांच्या गुणवत्तेचा योग्य सन्मान होत नाही आणि त्यांच्या संधी मर्यादित होतात.

यामुळे एक गंभीर सामाजिक परिणाम निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. "आपण ज्या विद्यापीठात शिकलो ते कमी दर्जाचे आहे" ही भावना त्यांच्या आत्मविश्वासावर परिणाम करते. शिक्षण ही आत्मविश्वास वाढविण्याची प्रक्रिया असताना, हा शासन आदेश उलट त्या प्रक्रियेला बाधा आणतो. विशेषतः ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी हा परिणाम अधिक तीव्र असतो.

याचबरोबर, या निर्णयामुळे शिक्षण व्यवस्थेमध्ये वर्गभेद निर्माण होण्याची शक्यता वाढते. एकीकडे उच्च क्रमांकाच्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारा सधन वर्ग, तर दुसरीकडे स्थानिक विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारा सर्वसामान्य वर्ग अशी विभागणी निर्माण होते. ही विभागणी केवळ शैक्षणिक नसून सामाजिक आणि मानसिक स्वरूपाचीही आहे. यामुळे समाजात दरी वाढते आणि समतेचा पाया कमकुवत होतो.

या सर्व पार्श्वभूमीवर, हा शासन आदेश केवळ एक शैक्षणिक धोरण नसून सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना आव्हान देणारा निर्णय ठरतो. त्यामुळे याचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता आणि समता यांचा समतोल राखणे ही शासनाची जबाबदारी आहे. परंतु सध्याचा निर्णय हा समतेपेक्षा असमतोल वाढविणारा ठरत असल्याचे स्पष्ट दिसते.

शिक्षण, समानता आणि संविधानिक मूल्यांवरील परिणाम: दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेल्या शासन आदेशाच्या परिणामांचा विचार केवळ विद्यार्थ्यांच्या शिक्षणापुरता मर्यादित ठेवून चालणार नाही; कारण या निर्णयाचा सर्वात थेट आणि दीर्घकालीन परिणाम शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेवर, शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेवर आणि समाजातील समतेच्या संकल्पनेवर होणार आहे. या आदेशानुसार उमेदवारांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे मूल्यांकन करताना त्यांच्या शिक्षण घेतलेल्या विद्यापीठाच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) क्रमांकाचा आधार घेतला जात असल्यामुळे, शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेतच असमानतेची बीजे पेरली जात आहेत.

शिक्षक किंवा प्राध्यापक हा केवळ ज्ञान देणारा घटक नसून तो समाज घडविण्याचा केंद्रबिंदू असतो. विविध सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीतून आलेले शिक्षक किंवा प्राध्यापक विद्यार्थ्यांना व्यापक दृष्टिकोन देतात. परंतु जर शिक्षक भरती प्रक्रियेमध्येच काही विशिष्ट विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना अधिक प्राधान्य दिले गेले, तर या प्रक्रियेतून येणारी विविधता कमी होईल. परिणामी, शिक्षण क्षेत्रात एकसुरीपणा निर्माण होईल आणि विद्यार्थ्यांना विविध सामाजिक वास्तवांचा अनुभव घेण्याची संधी कमी मिळेल.

या शासन आदेशामुळे ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील उमेदवारांना शिक्षक किंवा प्राध्यापक होण्याची संधी कमी मिळण्याची शक्यता आहे. कारण बहुसंख्य असे उमेदवार हे राज्यातील स्थानिक विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेले असतात. त्यांच्या विद्यापीठांचा NIRF क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना गुणांकनात कमी स्थान दिले जाईल. यामुळे त्यांच्या गुणवत्तेचा योग्य विचार न होता केवळ संस्थेच्या क्रमांकावरून त्यांचे मूल्यमापन केले जाईल. हा प्रकार केवळ अन्यायकारकच नाही, तर शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांनाही विरोध करणारा आहे.

संविधानाच्या दृष्टीने पाहिले असता, भारतातील प्रत्येक नागरिकाला समान संधी मिळण्याचा अधिकार आहे. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना पुढे आणण्यासाठी अनेक विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. परंतु या शासन आदेशामुळे या घटकांना प्रत्यक्षात स्पर्धेबाहेर ढकलले जात आहे. शिक्षण हे सामाजिक उन्नतीचे सर्वात प्रभावी साधन मानले जाते; परंतु जर शिक्षणाच्या संधीच मर्यादित केल्या गेल्या, तर सामाजिक न्यायाची संकल्पना केवळ कागदावरच उरेल.

या निर्णयामुळे राज्यातील इतर विद्यापीठांच्या प्रतिमेवरही विपरीत परिणाम होतो. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील विद्यापीठे ही केवळ शिक्षण संस्था नसून त्या त्या भागातील सामाजिक आणि आर्थिक विकासाची केंद्रे आहेत. या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी अनेक अडचणींवर मात करून पुढे येतात. परंतु त्यांच्या विद्यापीठांचा क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना कमी लेखले जाते. यामुळे या विद्यापीठांची प्रतिष्ठा कमी होते आणि त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलतो.

याचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे गुणवत्तावान विद्यार्थी आणि शिक्षक किंवा प्राध्यापक हे मोठ्या शहरांकडे स्थलांतर करतात. परिणामी, स्थानिक विद्यापीठे कमकुवत होतात. त्यांच्याकडे संसाधनांची कमतरता निर्माण होते आणि त्यांच्या विकासावर परिणाम होतो. ही प्रक्रिया पुढे जाऊन शिक्षणातील प्रादेशिक विषमता अधिक वाढवते. एकीकडे पुणे आणि मुंबईसारखी विद्यापीठे, शहरे अधिक मजबूत होतात, तर दुसरीकडे इतर भाग मागे पडतात.

या धोरणाचा मानसिक परिणामही अत्यंत गंभीर आहे. विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्या शिक्षण संस्थेबद्दल न्यूनगंड निर्माण होतो. "आपण ज्या विद्यापीठात शिकलो ते कमी दर्जाचे आहे" ही भावना त्यांच्या आत्मविश्वासावर परिणाम करते. शिक्षण ही आत्मविश्वास वाढवणारी प्रक्रिया असताना, हा शासन आदेश उलट त्या प्रक्रियेला बाधा आणतो. विशेषतः आदिवासी, दलित आणि बहुजन विद्यार्थ्यांसाठी हा परिणाम अधिक तीव्र असतो, कारण ते आधीच सामाजिक आणि आर्थिक अडचणींना सामोरे जात असतात.

याचबरोबर, या निर्णयामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये "गुणवत्ता" या संकल्पनेचा चुकीचा अर्थ लावला जातो. गुणवत्ता म्हणजे केवळ संस्थेचा क्रमांक नव्हे, तर विद्यार्थ्यांची मेहनत, त्यांचे कौशल्य, त्यांची विचारशक्ती आणि त्यांच्या अध्यापन क्षमतेचा एकत्रित परिणाम असतो. परंतु सध्याच्या धोरणामुळे गुणवत्ता ही केवळ क्रमांकापुरती मर्यादित केली जात आहे. हा दृष्टिकोन शिक्षणाच्या मूळ उद्दिष्टांनाच विरोध करणारा आहे.

२०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांच्या संदर्भात ही समस्या अधिक गंभीर होते. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) ही प्रणाली त्या काळात अस्तित्वातच नव्हती. त्यामुळे त्या काळातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षणासाठी कोणतेही निर्णय घेताना या क्रमवारीचा विचार केलेला नव्हता. अशा विद्यार्थ्यांवर हा निकष लावणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करणे होय. हा निर्णय केवळ तांत्रिकदृष्ट्या चुकीचा नाही, तर नैतिकदृष्ट्याही अयोग्य आहे.

या सर्व बाबींचा विचार करता, हा शासन आदेश शिक्षणातील विषमता वाढविणारा, सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना बाधा आणणारा आणि राज्यातील इतर विद्यापीठांचे अवमूल्यन करणारा ठरतो. त्यामुळे याचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रात कोणतेही धोरण राबविताना त्याचा सर्व घटकांवर होणारा परिणाम विचारात घेणे गरजेचे आहे.

पर्याय, उपाय आणि समतोल शिक्षणव्यवस्थेची गरज दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेल्या शासन आदेशामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करता, केवळ टीका करून थांबणे पुरेसे नाही; तर त्यासाठी योग्य पर्याय आणि रचनात्मक उपाय सुचवणे ही काळाची गरज आहे. शिक्षण क्षेत्र हे केवळ ज्ञान देण्याचे माध्यम नसून ते सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. त्यामुळे या क्षेत्रात घेतलेले कोणतेही धोरणात्मक निर्णय हे सर्वसमावेशक, न्याय्य आणि वास्तववादी असणे आवश्यक आहे. परंतु सध्याच्या शासन आदेशामध्ये गुणवत्ता या संकल्पनेचा जो अरुंद अर्थ लावण्यात आला आहे, तो बदलणे अत्यंत गरजेचे आहे.

सर्वप्रथम, उमेदवारांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करताना त्यांच्या शिक्षण संस्थेच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) क्रमांकावर आधारित निकष लावण्याऐवजी त्यांच्या वैयक्तिक क्षमतेवर आधारित मूल्यांकन प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे ज्ञान, संशोधन क्षमता आणि सामाजिक बांधिलकी या घटकांचा विचार करून त्यांचे मूल्यमापन केले पाहिजे. केवळ संस्थेच्या क्रमांकावर आधारित मूल्यांकन केल्यास अनेक गुणवत्तावान उमेदवार संधीपासून वंचित राहतात.

दुसरे महत्त्वाचे पाऊल म्हणजे राज्यातील सर्व विद्यापीठांना समान संधी उपलब्ध करून देणे. महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यापीठ हे त्या त्या भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे प्रमुख केंद्र आहे. त्यामुळे त्यांना आवश्यक निधी, संशोधन सुविधा, पायाभूत सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षक किंवा प्राध्यापक उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. जर सर्व विद्यापीठांची गुणवत्ता सुधारली, तर विद्यार्थ्यांना केवळ काही मोजक्या विद्यापीठांवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही.

तिसरे म्हणजे, ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी विशेष सुविधा आणि सवलती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. पुणे किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत, वसतिगृह सुविधा, शिष्यवृत्ती आणि मार्गदर्शन केंद्रे उपलब्ध करून दिली गेली, तर काही प्रमाणात विषमता कमी होऊ शकते. परंतु दीर्घकालीन उपाय म्हणून शिक्षणाचे विकेंद्रीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. परदेशी विद्यापीठांच्या संदर्भातही शासनाने वास्तववादी दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. QS, THE आणि ARWU सारख्या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणे हे सर्वांसाठी शक्य नाही. त्यामुळे या निकषाचा वापर केवळ अतिरिक्त गुणवत्तेचा घटक म्हणून करावा, तो अनिवार्य निकष म्हणून लावू नये. अन्यथा हा निकष केवळ सधन वर्गासाठीच फायदेशीर ठरेल.

२०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांसाठी स्वतंत्र धोरण तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) ही प्रणाली त्या काळात अस्तित्वात नव्हती, त्यामुळे त्या काळातील विद्यार्थ्यांवर हा निकष लावणे अन्यायकारक आहे. अशा उमेदवारांसाठी त्यांच्या अनुभव, कार्यक्षमता आणि इतर गुणांवर आधारित मूल्यांकन प्रणाली तयार केली पाहिजे.

याचबरोबर, शिक्षण क्षेत्रात "गुणवत्ता" या संकल्पनेचा व्यापक अर्थ स्वीकारणे गरजेचे आहे. गुणवत्ता म्हणजे केवळ उच्च क्रमांकाच्या संस्थेत शिक्षण घेणे नव्हे, तर त्या शिक्षणाचा समाजावर होणारा परिणाम महत्त्वाचा असतो. अनेकदा ग्रामीण भागातील विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेले विद्यार्थी समाजात अधिक प्रभावी कामगिरी करतात. त्यामुळे त्यांच्या योगदानाचा योग्य सन्मान करणे आवश्यक आहे.

शासनाने या निर्णयाचा पुनर्विचार करताना सामाजिक न्याय, समान संधी आणि सर्वसमावेशक विकास या तत्त्वांचा विचार करणे आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रातील कोणतेही धोरण हे केवळ काही मोजक्या लोकांसाठी नव्हे, तर सर्व घटकांसाठी फायदेशीर असावे. अन्यथा अशा धोरणांमुळे समाजात असंतोष निर्माण होण्याची शक्यता असते. या संदर्भात, शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणि न्याय्यता सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. उमेदवारांची निवड करताना त्यांच्या वास्तविक गुणवत्तेचा विचार केला गेला पाहिजे. तसेच, विविध सामाजिक पार्श्वभूमीतील उमेदवारांना समान संधी मिळेल याची खात्री करणे गरजेचे आहे. यामुळे शिक्षण क्षेत्रात विविधता टिकून राहील आणि विद्यार्थ्यांना व्यापक दृष्टिकोन मिळेल.

शेवटी, शिक्षण हे समाजातील विषमता कमी करण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे. परंतु जर शिक्षण व्यवस्थेमध्येच विषमता निर्माण केली गेली, तर समाजातील दरी अधिक वाढेल. त्यामुळे आज गरज आहे ती समतोल, न्याय्य आणि सर्वसमावेशक शिक्षण धोरणाची. शासनाने घेतलेले निर्णय हे दीर्घकालीन परिणाम लक्षात घेऊनच घ्यावेत.

११ फेब्रुवारी २०२६ चा शासन आदेश हा गुणवत्ता वाढविण्याच्या उद्देशाने घेतलेला असला, तरी त्याचे परिणाम विचारात घेतले असता तो सामाजिक विषमता वाढविणारा ठरतो. त्यामुळे या निर्णयाचा पुनर्विचार करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा "गुणवत्ता" या नावाखाली आपण नकळतपणे समाजात असमानता वाढवत आहोत, आणि हे कोणत्याही प्रगत समाजासाठी योग्य नाही.

**- डॉ. राजेंद्र बगाटे, एम.ए, नेट-जेआरएफ, एम.फिल., पीएच. डी. पोस्ट-डॉक्टरेट (पीडीएफ), (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)*, ईमेल - bagate.rajendra5@gmail.com**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### नारायणगाव येथील शरदचंद्र पतसंस्थेच्या ठेवींची 300 कोटींकडे झेप

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील राजुरी येथे असलेल्या शरदचंद्र नागरी सहकारी पतसंस्थेने ठेवींमध्ये 300 कोटींकडे झेप घेतली आहे. शरदचंद्र नागरी सहकारी पतसंस्था ही महाराष्ट्र राज्य कार्यक्षम पतसंस्था असून 17 शाखा शहरी भागापासून ग्रामीण भागात पसरलेल्या आहेत.या पतसंस्थेचे मार्च २०२५ या आर्थिक वर्षात सभासद १६५७७,खेळते भांडवल ३०९.७० कोटी रुपये , एकुण ठेवी २४५.२२ कोटी रुपये ,एकुण कर्ज १९७.६२ कोटी रुपये ,वसुल भाग भांडवल १५.६९ कोटी रुपये , गुंतवणूक ८४.६३ कोटी रुपये ,एकुण निधी २०.७० कोटी रुपये ,एकुण थकबाकी १२.५५ टक्के होती. मागील वर्षीच्या तुलनेत या आर्थिक वर्षात मार्च 2026 अखेर संस्थेचे सभासद १८१४७,खेळते भांडवल ३७४.०० कोटी रुपये , ठेवी ३०१.७० कोटी रुपये , कर्ज २४६.९८ कोटी रुपये ,वसुल भाग भांडवल १७.७२ कोटी रुपये , गुंतवणूक ९१.१९ कोटी रुपये ,थकबाकी ९.२० टक्के आहे.अशी संस्थेची परिस्थिती आहे. अशी माहिती एम. डी. घंगाळे यांनी दिली.

### टाकळी हाजी नजीक घोड नदीत आढळला अज्ञात पुरुषाचा मृतदेह

कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथील घोडनदी पात्रात गुरुवारी सकाळी एका अज्ञात पुरुषाचा मृतदेह आढळून आला. स्थानिक नागरिकांना पाण्यात मृतदेह तरंगताना दिसल्यानंतर ग्रामस्थांच्या मदतीने तो बाहेर काढण्यात आला.संबंधित व्यक्तीचे वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे असून त्याची ओळख पटलेली नाही. याप्रकरणी टाकळी हाजी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून अधिक तपास सुरू आहे.

### ओझर येथे मोफत दिव्यांग शिबिराचे आयोजन

नारायणगाव (दैनिक संध्या) : रोटरी क्लब ऑफ पुना वेस्ट यांच्या निधीतून भारत विकास परिषदेचे दिव्यांग केंद्र पुणे आयोजित श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट, श्री क्षेत्र ओझर यांच्या सहयोगाने मोफत दिव्यांग शिबिर सोमवार दि 27 एप्रिल रोजी श्री क्षेत्र ओझर (गणपतीचे) भक्तनिवास क्र. 1 येथे सकाळी 9 ते दुपारी 2 वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात आधुनिक कृत्रिम मॉड्यूलर पाय ज्याची बाहेर कमर्शियल किंमत रु. 50 हजार रुपयांपेक्षा जास्त आहे असा पाय मोफत देणार आहे. या शिबिराला जाण्यासाठी दिव्यांग व्यक्तींसाठी नारायणगाव, आळेफाटा,ओतूर,जुन्नर बसस्थानकावर सकाळी 9 ते 12 या वेळेत पीकअपची सोय करण्यात आली आहे.ज्या कोणाचे परिचित दिव्यांग व्यक्ती असतील तर त्यांनी विनोद मो. नं. 8788616751 व जोशी मो. नं.9820599108 यांच्याशी फोनवर संपर्क साधून पूर्व नोंदणी करावी, अशी विनंती श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्टने केली आहे.

### वाल्हे नगरीत हनुमान जयंती उत्साहात

वाल्हे (दैनिक संध्या) : वाल्हे (ता. पुरंदर) नगरीत विविध धार्मिक कार्यक्रमांद्वारे हनुमान जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.यावेळी पहाटेपासूनच मारुती मंदिरात भाविकांनी उत्सवमूर्तींच्या दर्शनासाठी अलोट गर्दी केली होती. वाल्हे गावचे ग्रामदैवत असलेल्या श्री भैरवनाथ देवाच्या यात्रेला लवकरच सुरवात होणार असल्याने गावात आत्तापासूनच भाविकांची रेलचेल सुरु झाली आहे.त्यातच बजरंगबलीच्या जन्मोउत्सवानिमित्त भल्या पहाटे उत्सवमूर्तींना पंचामृताने शाही स्नान घालण्यात आले. त्यानंतर रुद्राभिषेक आरती व इतर धार्मिक कार्यक्रमांना सुरवात करण्यात आली. यावेळी उत्सवमूर्तींच्या जन्मोत्सवा नंतर सामाजिक कार्यकर्ते नाना दाते यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आल्याने भाविकांमध्ये कमालीचा उत्साह जाणवत होता.

### अवकाळी पावसामुळे जुन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांचे नुकसान

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील नारायणगाव, वारूळवाडी, मांजरवाडी, ओतूर पारगाव तर्फे आळे,मंगरूळ, झापवाडी, पाडळी आळे यातील काही ठिकाणी वादळी वारा तर काही ठिकाणी गारपीट पाऊस होऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.या भागात भाजीपाला पिकांसह कांदा उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. झालेल्या गारपीटीमुळे कांदा,मका,भाजीपाला, टोमॅटो, कोथिंबीर तसेच आंबा, डाळिंब या बागांचे मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्यांचा हाताशी आलेला घास हिरावला गेला आहे. या पार्श्वभूमीवर माजी जिल्हा परिषद सदस्य पांडुरंग पवार तसेच स्थानिक शेतकऱ्यांनी महसूल व कृषी विभागाकडे तातडीने शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.



### भाजप महिला आघाडीचे निवेदन; आधार केंद्रे तातडीने सुरु करण्याची मागणी

शिरूर (दैनिक संध्या) : शिरूर शहरातील सरकारी आधार केंद्रे बंद असल्यामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाच्या पार्श्वभूमीवर भाजप महिला आघाडीच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनाद्वारे आधार केंद्रे तात्काळ सुरू करून नागरिकांची गैरसोय दूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. भाजप महिला आघाडीच्या शिरूर शहर अध्यक्षा प्रिया बिरादार व उपाध्यक्षा सृष्टी करंजुले यांच्या नेतृत्वाखाली शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांना हे निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शिरूर शहर व तालुक्यातील अधिकृत आधार केंद्रे बंद असल्याने नागरिकांना नवीन आधार नोंदणी व अद्ययावत करण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सरकारी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना खासगी सीएससी केंद्रांकडे जावे लागत असून, तेथे अवाजवी शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात येत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. यावेळी संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तातडीने सर्व आधार केंद्रे सुरू करावीत, तसेच सीएससी केंद्रांवर शासनाने निश्चित केलेले शुल्क स्पष्टपणे लावण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासनाने त्वरित योग्य ती कार्यवाही करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा भाजप महिला आघाडीच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

# हुतात्मा हरी मकाजी नाईक यांना जेजुरीत आदरांजली

## हुतात्मा हरी नाईक यांच्या स्मृती जतन करण्यासाठी कटिबद्ध : नगराध्यक्ष जयदीप बारभाई

जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत व बहुजन समाजाचा लोकदेव असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या नगरीत हुतात्मा हरी मकाजी नाईक यांच्या बलिदान दिनानिमित्त जेजुरी नगरपरिषद, आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक संघटना व रामोशी समाजाच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली.

जेजुरी नगरपरिषद, क्षत्रिय रामोशी समाज संघटना, आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक संघटनेच्या वतीने हुतात्मा हरी मकाजी नाईक यांच्या बलिदान दिनानिमित्त त्यांच्या स्मृतीला अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांच्या हस्ते स्मारकाला पुष्पचक्र व पुष्पवृष्टी करून आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी श्री मार्तंड देवसंस्थानचे अध्यक्ष मंगेश घोणे, विश्वस्त पोपटराव खोमणे, मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले , श्री खंडोबा पालखी सोहळा ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे,नगरसेवक रोहित खोमणे, शिवाजी जगताप, कृष्णा कुदळे, नगरसेविका स्नेहल भालेराव, भक्ती कोरपड, क्षत्रिय रामोशी समाज संघटनेचे राज्य अध्यक्ष आप्पासाहेब चव्हाण, कार्यकर्ते आप्पासाहेब भांडवलकर, सुनील जाधव, गणेश सोनवणे, रवींद्र खोमणे,अशोक खोमणे आरपीआयचे पंढरीनाथ जाधव, अभ्यासक शिवराज झगडे, नगरपरिषदेचे आधिकारी बाळासाहेब खोमणे, व मोठ्या संख्येनं ग्रामस्थ उपस्थित होते.

नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांनी पुरंदर तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची पहिली लढाई लढली. आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक यांची प्रेरणा घेवून हुतात्मा हरी मकाजी नाईक यांनी स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांशी लढा दिला. 4 एप्रिल 1889 रोजी सोमवती यात्रेदिवशी त्यांना जेजुरीत फाशी दिली. त्यांच्या पवित्र स्मृती जतन करण्यासाठी जेजुरीकर नागरिक कटिबध्द आहेत असे यावेळी सांगितले. यावेळी जेजुरी देवसंस्थान चे अध्यक्ष मंगेश घोणे, विश्वस्त पोपट खोमणे यांची भाषणे झाली. हुतात्मा हरी मकाजी नाईक चरित्राचे अभ्यासक शिवराज झगडे यांनी हरी मकाजी नाईक यांच्या कार्याबद्दल माहिती देवून तत्कालीन मुख्यमंत्री अर अंतुले यांनी 1981 साली जेजुरीत हुतात्मा हरी मकाजी नाईक यांचे स्मारक उभारले असल्याचे सांगितले.

क्षत्रिय रामोशी समाज संघटनेचे राज्य अध्यक्ष आप्पासाहेब चव्हाण यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात रामोशी समाजाचा मोठा वाटा आहे. राज्यात गावोगावी 60 लाखाहून अधिक रामोशी समाज आहे. सतत वंचित असलेल्या समाजाला विधान परिषदेत प्रतिनिधित्व मिळावे अशी मागणी यावेळी केली.

## घरफोड्यांतील २ वर्षे फरार असलेला १२ गुन्ह्यांचा आरोपी जेरबंद

उरुळी कांचन (दै. संध्या)

दौंड तालुक्यात घरफोड्यांकरून २ वर्षापासून १२ गुन्ह्यात फरार असलेला आरोपीस स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने जेरबंद करण्यात यश मिळवले आहे. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार याप्रकरणी कोहिनूर विशाल पवार (वय २१, रा. म्हातोबाची आळंदी,ता. हवेली, जि. पुणे) याला अटक करण्यात आली आहे.२ एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा पुणे ग्रामीण यांचे पथक उरुळी कांचन पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गोपनीय बातमीदारामार्फत फरारी आरोपी कोहिनूर पवार हा उरूळी कांचन पोलीस स्टेशन हद्दीत कुंजीरवाडी फाटा परिसरात असले बाबत खात्रीशीर बातमी मिळाली.वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांचे आदेशाने तात्काळ सदर ठिकाणी सापळा रचून त्यास ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्याने आपण दौड तालुक्यातील यवत पोलीस ठाण्याचे हद्दीत घरफोडीचे गुन्हे केले असल्याची कबुली दिली. अधिक चौकशीत तो गेले २ वर्षापासून १२ गुन्ह्यात फरार असल्याची धक्कादायक बाब समोर आली. त्याची योग्य ती खात्री करून त्याची वैद्यकीय तपासणी करून पुढील कार्यवाही करीता यवत पोलिस स्टेशन यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## “कोण आहे रामलिंगचा प्रज्ञावंत?” स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर तालुक्यातील रामलिंग येथे स्व.गणेश गौतम घावटे पाटील यांच्या ३७ व्या जयंतीनिमित्त “कोण आहे रामलिंगचा प्रज्ञावंत?” ही २०२६ सालातील सामान्य ज्ञानावर आधारित परीक्षा उत्साहात पार पडली. रामलिंग महिला उन्नती बहुउद्देशीय सामाजिक संस्था व स्व. गणेश गौतम घावटे पाटील युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामलिंग येथे स्व. घावटे पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून परीक्षेला सुरुवात करण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमधील बुद्धिमत्ता, आत्मविश्वास आणि




स्पर्धा परीक्षांची तयारी वाढावी, तसेच त्यांच्या सामान्य ज्ञानात भर पडावी या उद्देशाने ही स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाते.

या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक प्रणिता कापरे, द्वितीय क्रमांक रुद्र माने आणि तृतीय क्रमांक दीक्षा कांबळे यांनी पटकावला.

कार्यक्रमादरम्यान अनेक मान्यवरांनी मनोगते व्यक्त करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता जगताप तसेच शिक्षक दादाभाऊ वाघमारे, अनिल जगदाळे, जयश्री मांजरे, नीता वाबळे, जाधव मॅडम, लाळगे मॅडम, टोणगे मॅडम आणि इतर शिक्षकवृंद यांनी मोलाचे सहकार्य केले.यावेळी शाळेला महापुरुषांच्या फोटो फ्रेम्स भेट देण्यात आल्या.

कार्यक्रमास उपसरपंच यशवंत कर्डीले, सामाजिक कार्यकर्ते गौतम घावटे, विठ्ठल जगदाळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विजू दौंडकर, सदस्य निलेश लोंढे, रमेश कर्डीले, पुनम औटी यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रामलिंग महिला उन्नती बहुउद्देशीय सामाजिक संस्था अध्यक्ष राणी कर्डीले यांनी केले.

## राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे प्रलंबित कामांबाबत चर्चा

- माजी आमदार संजय जगताप यांची अधिकाऱ्यांसोबत महत्त्वाची बैठक
- उड्डाणपूल आणि रस्ता रुंदीकरणाचे प्रस्ताव मार्गी लावण्याच्या सूचना

सासवड (दै. संध्या)



पुरंदर आणि हवेली तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गाची प्रलंबित कामे, उड्डाणपूल आणि शहरांतर्गत रस्ते रुंदीकरण या विषयांवर माजी आमदार संजय जगताप यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसोबत पुण्यात सकारात्मक चर्चा केली. सासवड, जेजुरी, नीरा आणि फुरसुंगी या भागातील रखडलेली कामे, वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी विविध उपाययोजना करण्याच्या मागण्या यावेळी करण्यात आल्या.

पुणे येथील महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यालयात झालेल्या या बैठकीस प्राधिकरणाचे प्रबंधक एस. एस. कदम आणि अभियंता अभिजीत औटी व इतर अधिकारी उपस्थित होते. यावेळी संजय जगताप यांनी पुरंदर - हवेलीतील महत्त्वाच्या शहरांतील वाहतूकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मागण्या मांडल्या.

यामध्ये सासवड बाह्यवळणाच्या चंदनटेकडी आणि बोरावके मळा या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल उभारणे.

सासवड हद्दीतील चंदन टेकडी ते बोरावके मळा या शहरातून जाणाऱ्या रस्त्याचा पालखी महामार्गात समावेश करून भूसंपादनासह चौपदरीकरण करणे. याबरोबरच पिसुर्टी फाटा ते लोणंद बाह्यवळण या दरम्यानच्या पिसुर्टी फाटा ते नीरा शहर आणि नीरा शहर ते लोणंद या रस्त्याचे भूसंपादन करून चौपदरीकरण करणे.

जेजुरी शहरात वाहतूक सुलभतेसाठी उड्डाणपूल उभारणे. दिवे घाटातील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे नवीन बांधकाम करणे.

फुरसुंगी - भेकराईनगर येथे उड्डाणपुलाची निर्मिती करणे.

तसेच, फुरसुंगी - भेकराईनगर येथील राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या मुख्य ड्रेनेज लाईन संदर्भात महामार्ग प्राधिकरणाचे अभियंता व फुरसुंगी नगरपालिकेचे मुख्याधिकारी व अभियंता यांनी एकत्रित कामाची पाहणी करून येणाऱ्या अडिअडचणी सोडवण्याबाबत चर्चा झाली.

अधिकाऱ्यांचे सकारात्मक आश्वासन : या मागण्यांवर बोलताना प्रबंधक एस . एस. कदम आणि अभियंता अभिजीत औटी यांनी सांगितले की, सासवड आणि नीरा शहरातील रस्ते भूसंपादनाबाबतचा प्रस्ताव वरिष्ठांकडे तात्काळ सादर केला जाईल. सासवड येथील चंदन टेकडी आणि बोरावके मळा येथील उड्डाणपुलांचे काम लवकरच सुरू करण्यात येणार आहे. जेजुरीतील उड्डाणपुलाचा नकाशा तयार असून, फुरसुंगी-भेकराईनगर येथील उड्डाणपूल भविष्यातील मेट्रोच्या मार्गीकेला अनूसरून, मेट्रो मार्गीकेचा विचार करून तयार करण्यात येणार आहे. असे त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीस सासवडचे उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, जिल्हा परिषद सदस्य अजय इंगळे, वडकीतील सचिन गायकवाड, फुरसुंगीतील रणजित रासकर यांच्यासह सर्व नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

## “महाराष्ट्राची हास्यजत्रा”मध्ये निर्मिती सावंत यांचा खास धमाका!

पुणे (दै. संध्या)

सोनी मराठी वाहिनी नेहमीच दर्जेदार आणि प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे मनोरंजन देत आली आहे. कुटुंबासह पाहता येतील असे विविध कार्यक्रम सादर करत, सोनी मराठीने प्रेक्षकांच्या मनात एक खास स्थान निर्माण केले आहे. याच वाहिनीवरील अत्यंत लोकप्रिय आणि विनोदी कार्यक्रम म्हणजे “महाराष्ट्राची हास्यजत्रा”.

“महाराष्ट्राची हास्यजत्रा” हा कार्यक्रम प्रेक्षकांना दर आठवड्याला खळखळून हसवतो. उत्कृष्ट लेखन, भन्नाट परफॉर्मन्स आणि कलाकारांची जबरदस्त टाइमिंग यामुळे हा शो प्रत्येक घरात आवडीने पाहिला जातो. हा कार्यक्रम दर सोमवार आणि मंगळवारी रात्री ९ वाजता सोनी मराठीवर प्रसारित होतो. या आठवड्याचा एपिसोड खास ठरणार आहे, कारण प्रेक्षकांची लाडकी अभिनेत्री निर्मिती सावंत एक भन्नाट स्किट सादर करताना दिसणार आहेत. "मॅरेज फोटो अल्बम" असे या स्किटचे नाव असून, या स्किटमध्ये निर्मिती सावंत यांच्यासोबत पृथ्विक प्रताप आणि वनिता खरात हे कलाकारही झळकणार आहेत. या तिघांनी मिळून या स्किटमध्ये अक्षरशः धमाल उडवली आहे. निर्मिती ताईंची स्टेजवरील उपस्थिती, त्यांची अफलातून कॉमिक टाइमिंग आणि सहज अभिनय प्रेक्षकांना नेहमीच भुरळ घालतो. त्यांच्या प्रत्येक एंट्रीला प्रेक्षकांकडून भरभरून प्रतिसाद मिळतो. "मॅरेज फोटो अल्बम" या स्किटमध्येही त्यांनी त्याच जादुई अंदाजात प्रेक्षकांना खळखळून हसवले आहे. हास्यजत्रेच्या मंचावर त्यांचा हा खास अंदाज पाहायला मिळणार आहे. मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीत निर्मिती सावंत यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ज्या काळात विनोदी क्षेत्रात महिला कलाकारांची संख्या अत्यंत कमी होती, त्या काळात त्यांनी आपल्या दमदार अभिनय आणि टायमिंगच्या जोरावर एक वेगळी उंची गाठली. त्यांच्या कॉमेडीची शैली, संवादफेक आणि व्यक्तिमत्त्व आजही अनेक कलाकारांसाठी प्रेरणादायी आहे.


# निवडणूक प्रचाराच्या जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण आवश्यक

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

पुणे (दै. संध्या)

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती (मीडिया सर्टीफीकेशन ॲण्ड मॉनिटरिंग कमिटी) गठित करण्यात आली आहे. बारामती विधानसभा पोट निवडणूकीच्या अनुषंगाने निवडणूक प्रचाराच्या जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण या समितीकडून करून घेणे आवश्यक आहे, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच समितीचे अध्यक्ष जितेंद्र डुडी यांनी कळविले आहे.

उमेदवारांमार्फत प्रचारासाठी इलेक्ट्रॉनिक, समाज माध्यमे (सोशल मीडिया) तसेच फिरत्या एलईडी व्हॅन, ऑटो रिक्षा आदी बाह्यमाध्यमांवरून देण्यात येणाऱ्या श्राव्य (ऑडिओ), दृकश्राव्य (ऑडिओ-व्हीज्युअल) जाहिरांतीचे पूर्व प्रमाणीकरण या समितीमार्फत केले जाते. तर मुद्रीत माध्यमात (प्रिंट मीडिया) मतदानाच्या दिवशी किंवा मतदानाच्या एक दिवस अगोदर प्रकाशित करावयाच्या जाहिराती समितीकडून पूर्व प्रमाणीकरण करून घेणे बंधनकारक आहे. माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समितीचे कामकाज जिल्हा माहिती कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, तळमजला, ससून रुग्णालयासमोर, पुणे- ४११००१ येथून चालणार असून दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२१३०७ असा आहे. टीव्ही चॅनेल, रेडिओ, एफएम, सिनेमागृह, सोशल मिडीया,



एसएमएस, दूरध्वनीवरील रेकॉर्डेड व्हॉईस कॉलद्वारे करण्यात येणाऱ्या प्रचाराच्या जाहिराती (आऊटबाऊंड डायलिंग– ओबीडी), वृत्तपत्रांच्या इ-आवृत्तीतील जाहिराती, सार्वजनिक ठिकाणी दाखवायच्या दृक-श्राव्य जाहिरातींसाठी प्रसारणपूर्व प्रमाणपत्र बंधनकारक आहे. त्यासाठी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी विहीत नमुन्यातील इंग्रजी किंवा मराठी भाषेतील अर्ज दोन प्रतींमध्ये आवश्यक माहिती भरुन सादर करण्यात यावा. अर्जासोबत दोन सीडी/पेनड्राईव्ह (सीडीमधील गीत, संवाद, घोषणा यांच्या टंकलिखीत मजकुराच्या दोन प्रती – ट्रान्सस्क्रीपट) सादर करणे आवश्यक आहे. राजकीय पक्षांच्या जाहिराती राज्यस्तरावरील समितीकडून प्रमाणित केल्या जातात.

प्रत्येक ऑडिओ जाहिरात किंवा ऑडिओ-व्हीज्युअल जाहिरात ही स्वतंत्र असावी. एकाच सीडी, पेनड्राईव्हमध्ये एकापेक्षा अधिक जाहिराती असू नयेत. अर्जदाराचे पूर्ण नाव, पत्ता, जाहिरात कोणत्या उमेदवारासाठी आहे. त्याचे नाव, पक्षाचे नाव, जाहिरात कुठे दाखवणार, जाहिरातीचे शीर्षक, जाहिरात निर्मितीचा खर्च, जाहिरातीतील भाषा याचा स्पष्ट उल्लेख असावा. सीडीमधील मजकूर प्रसारण योग्य असावा. इतरांची बदनामी करणारा, जाती-जातींमध्ये, धार्मिक तेढ निर्माण करणारा नसावा. देशविघातक कृत्याला प्रोत्साहन देणारा नसावा. समितीमार्फत वृत्तपत्र आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील पेड न्यूजवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

### जिल्हा माहिती कार्यालयात माध्यम कक्ष कार्यान्वित

बारामती विधानसभा सार्वत्रिक निवडणूकच्या अनुषंगाने जिल्हा माहिती कार्यालयात माध्यम कक्ष (मीडिया सेल), नवीन प्रशासकीय इमारत, तळमजला, पुणे या ठिकाणी कार्यान्वित करण्यात आला असून त्याचा दूरध्वनी क्रमांक ०२०- २६१२१३०७ असा आहे. या ठिकाणाहून माध्यमांना निवडणुकीच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिली जात आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यम, समाज माध्यमांचे संनियंत्रण येथून होत आहे.